**सुविचार**

कोणतीच वेळ शुभ किंवा अशुभ नसते. माणूस आपल्या पराक्रमाने एखाद्या वेळेला महत्त्व आणून देतो.

साप्ताहिक

# अधिकारनामा

Email : adhikarnama2021@gmail.com    Web : www.adhikarnama.in

'अधिकारनामा' या साप्ताहिक साठी जिल्हा आणि तालुका प्रतिनिधी नियुक्त करायचे आहेत. इच्छुकांनी संपर्क करावा. मो. 9665382780, 9766382780

मुख्य संपादक : निलेश बा. किरतकार मो. ९६६५३८२७८०, ९७६६३८२७८०    कार्यालय : साप्ताहिक अधिकारनामा, गाडगे नगर, अमरावती – ४४४६०३

अकोला * बुधवार दि. १५ जून २०२२ * वर्ष २ रे * अंक ११ * किंमत २ रुपये * RNI Title Code No. : MAHMAR50842


## राष्ट्राच्या विकासात महाराष्ट्राचं महत्त्वाचं योगदान – पंतप्रधान नरेंद्र मोदी

साप्ता. अधिकारनामा

**मुंबई** : राजभवन हे प्रत्येक घडामोडीचे साक्षीदार आहे. नवीन राजभवन जनतेसाठी, राज्यपालांसाठी नवीन ऊर्जा देणारं आहे. जनतेसाठी हे राजभवन नाही तर लोकभवन आहे जे लोकांच्या अनेक अपेक्षा पूर्ण करेल. मी राजभवनात अनेकदा आलोय, कित्येकदा थांबलोय. राजभवनानं स्वातंत्र्यांचा तिरंगा फडकताना पाहिला आहे. देश स्वातंत्र्याची ७५ व्या अमृतमहोत्सव साजरा करत आहे. राजभवन अनेक ऐतिहासिक घटनांचे साक्षीदार आहे असं पंतप्रधान नरेंद्र मोदी म्हणाले. राजभवन येथे नवीन 'जलभूषण' इमारत क्रांतिकारी गॅलरीच्या उद्धाटनप्रसंगी ते बोलत होते. यावेळी नरेंद्र मोदी म्हणाले की, अतिशय चांगल्या कार्यक्रमासाठी आपण सगळे एकत्र आलो याचा आनंद आहे. स्वातंत्र्य संग्रामातील वीरांना ही वास्तू समर्पित करताना मला आनंद होतोय. चाफेकर बंधु, वासुदेव बळवंत फडके, लोकमान्य टिळक, स्वातंत्र्यवीर सावरकर यांनी आपापल्या मार्गाने देशाच्या स्वातंत्र्यलढ्यात सहभाग घेतला. स्वातंत्र्य चळवळ लोकलही होती आणि



ग्लोबलही होती. भारताच्या स्वातंत्र्य आंदोलनाने जगाला प्रेरणा दिले. आत्मनिर्भर अभियानामुळे भारताला नवीन ओळख निर्माण होत आहे असं त्यांनी सांगितले.

तसेच महाराष्ट्राने राष्ट्रीय विकासात महत्त्वाची भूमिका निभावली. मुंबईचा आधुनिक विकास होत आहे. मुंबई हे केवळ स्वप्नांचे शहर नाही, तर महाराष्ट्रात अशी अनेक शहरे आहेत, जी २१व्या शतकात देशाच्या विकासाची केंद्रे बनणार आहेत. या विचाराने एकीकडे मुंबईतील पायाभूत सुविधांचे आधुनिकीकरण होत आहे आणि त्याचवेळी इतर शहरांमध्येही आधुनिक सुविधा वाढवल्या जात आहेत. मेट्रो विस्तार, राज्यभरात सुरू असलेले नॅशनल हायवे पाहिले तर विकासाची सकारात्मक दृष्टी दिसते. राष्ट्रीय विकासासाठी सगळ्यांनी एकत्र आले पाहिजे. जगातील लोक आपल्यावर हसत असतील. ७५ वर्ष राजभवन इथे आहे परंतु बंकर असल्याचं अलीकडेच माहित पडले. आपल्या देशात खूप ऐतिहासिक वारसा आहे असं पंतप्रधान नरेंद्र मोदींनी सांगितले. दरम्यान, सामाजिक, कौटुंबिक, वैचारिक भूमिकांचा विचार न करता देशात आणि परदेशात जिथे जिथे चळवळीचे स्थान होते. प्रत्येकाचं ध्येय एकच भारताचे पूर्ण स्वातंत्र्य होते. महाराष्ट्राने देशाला अनेक क्षेत्रात प्रेरणा दिली आहे. सामाजिक क्रांतीबद्दल बोलायचे झाले तर जगतगुरू श्री संत तुकाराम महाराजांपासून बाबासाहेब आंबेडकरांपर्यंत समाजसुधारकांचा अतिशय समृद्ध वारसा आहे. नेताजींच्या नेतृत्वाखालील आझाद हिंद सरकार भारतीय हितासाठी समर्पित होते, पण त्याची व्याप्ती जागतिक होती. यामुळेच भारताच्या स्वातंत्र्य चळवळीने जगातील अनेक देशांच्या स्वातंत्र्य चळवळीला प्रेरणा दिली. आज या सागराकडे पाहून मला स्वातंत्र्यवीर सावरकरांची आठवण येतेय असंही मोदी म्हणाले.

## मुकेश अंबानींना टक्कर देण्याची अदानींची तयारी

साप्ता. अधिकारनामा

**मुंबई** : दोन दिग्गज उद्योजक मुकेश अंबानी आणि गौतम अदानी यांच्यात आणखी एका क्षेत्रात स्पर्धा होणार आहे. अंबानी यांनी ग्रीन एनर्जीमध्ये ७५ अब्ज गुंतवणुकीची घोषणा केली आहे. तज्ञांच्या मते, कंपनीचा भर ग्रीन हायड्रोजनवर असू शकतो. ग्रीन हायड्रोजन हे पाणी आणि क्लिन एनर्जीपासून बनवले जाते आणि त्याला भविष्यातील इंधन म्हटले जात आहे. दरम्यान, देशात ग्रीन हायड्रोजन इकोसिस्टम तयार करण्यासाठी अदानी यांनी फ्रेंच कंपनी टोटल एनर्जी सोबत हातमिळवणी केली आहे. त्यानुसार, टोटल एनर्जी अदानी समूहाची कंपनी अदानी न्यू इंडस्ट्रीज लिमिटेड मधील २५ टक्के हिस्सा खरेदी करणार आहे. अदानी समूह आणि टोटल यांच्यातील ही चौथी भागीदारी आहे.



यापूर्वी, दोन्ही कंपन्यांनी एलएनजी टर्मिनल, सिटी गॅस डिस्ट्रीब्युशन आणि सोलर पॉवरमध्ये भागीदारी केली आहे. ग्रीन हायड्रोजनशी संबंधित या नवीन भागीदारीमुळे भारत आणि जागतिक स्तरावर एनर्जी लँडस्केपच्या बदलांची अपेक्षा करण्यात येत आहे. अदानी न्यू इंडस्ट्रीज लिमिटेडचे पुढील १० वर्षांत ग्रीन हायड्रोजन आणि संबंधित इकोसिस्टममध्ये ५० बिलयन डॉलर्सपेक्षा अधिक गुंतवणूक करण्याचे उद्दिष्ट आहे. पहिल्या टप्प्यात एएनआयएल २०३० पूर्वी दरवर्षी १ मिलियन टन ग्रीन हायड्रोजन उत्पादन क्षमता विकसित करेल.

अदानी-टोटलएनर्जीज भागीदारीचे धोरणात्मक मूल्य हे व्यावसायिकता आणि महत्वाकांक्षा या दोन्ही स्तरांवर खूप मोठे असल्याचे मत अदानी समूहाचे अध्यक्ष गौतम अदानी यांनी व्यक्त केले. जगातील सर्वात मोठा ग्रीन हायड्रोजन प्लेयर बनण्याच्या आमच्या प्रवासात टोटल एनर्जीज सोबतची भागीदारी संशोधन आणि विकास, बाजारपेठेतील प्रवेश आणि अंतिम ग्राहकाची समज यासह अनेक बाबींना एकत्र करत असल्याचंही त्यांनी नमूद केलं. "टोटलएनर्जीजचा अदानी न्यू इंडस्ट्रीज लिमिटेडमधील प्रवेश हा आमच्या नूतनीकरणयोग्य आणि कमी कार्बन हायड्रोजन धोरणाच्या अंमलबजावणीसाठी एक महत्त्वाचा टप्पा आहे. २०३० पर्यंत आमच्या युरोपातील इंधन शुद्धीकरण प्रकल्पामध्ये वापरले जाणाऱ्या हायड्रोजनचे आम्हाला केवळ डिकार्बीनाइज करायचे नाही, तर याबाबतची मागणी पूर्ण करण्यासाठी ग्रीन हायड्रोजनचे मोठ्या प्रमाणावर उत्पादनदेखील करावयाचे लक्ष्य आहे," अशी प्रतिक्रिया टोटल एनर्जीचे अध्यक्ष आणि मुख्य कार्यकारी अधिकारी पॅट्रिक पोयाने यांनी दिली.

## पंकजा मुंडे भाजपाला ब्लॅकमेल करत आहेत, राणे समर्थकाचा खळबळजनक आरोप

साप्ता. अधिकारनामा

**सोलापूर** : माजी मंत्री पंकजा मुंडे यांना विधान परिषद निवडणुकीत डावलल्यानंतर त्यांच्या संतप्त समर्थकांनी केंद्रीय अर्थ राज्यमंत्री भागवत कराड यांच्या कार्यकर्त्यांना मारहाण केली. त्यानंतर तुळजापुरात विधान परिषदेतील विरोधी पक्षनेते प्रवीण दरेकर यांची मोटार अडवल्याचा प्रकार घडला. या पार्श्वभूमीवर भाजपातील खदखद बाहेर पडत असताना पंकजा मुंडे भाजपाला ब्लॅकमेल करीत असल्याचा आरोप पूर्वाश्रमीचे काँग्रेसचे सोलापूर जिल्हाध्यक्ष आणि भाजपामधील राणे समर्थक संतोष पाटील यांनी केला आहे. माजी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाला महाराष्ट्रात पर्याय नसल्याचा दावाही पाटील यांनी केला आहे. यासंदर्भात प्रसार माध्यमांना प्रसिद्धीसाठी दिलेल्या निवेदनात संतोष पाटील म्हणाले की, केवळ राजकीय द्वेषापोटी पंकजा मुंडे यांनी फडणवीस यांची प्रतिमा बहुजन समाजाविरोधी करण्याचा प्रयत्न चालवला आहे. त्यांचा पक्षांतर्गत जाणीवपूर्वक सुरू असलेला संघर्ष योग्य नाही, असं मतही व्यक्त केलं आहे.



दिवंगत नेते गोपीनाथ मुंडे यांच्या वारसदार असल्याचे सांगून पंकजा मुंडे पक्षाला नेहमीच ब्लॅकमेल करतात. वारसदार जन्माने नव्हे, तर कर्तृत्वाने ठरत असतो, याचा विचार पंकजा मुंडे यांनी केलेला दिसत नाही. शरद पवार, नितीन गडकरी यांच्यानंतर दिल्लीत शब्दाचे वजन असलेला देवेंद्र फडणवीस यांच्याशिवाय दुसरा नेता नाही. केंद्रीय मंत्री नारायण राणे हे फडणवीस यांची नेहमीच पाठराखण करतात, असंही पाटील यांनी म्हटलं आहे.

## मोसमी पावसाची विदर्भाकडे आगेकूच; राज्यात हलक्या पावसाचा अंदाज कायम

साप्ता. अधिकारनामा

**पुणे** : नैर्ऋत्य मोसमी पावसाने आता विदर्भाकडे वाटचाल सुरू केले आहे. येत्या दोन दिवसांत विदर्भातील काही भागांत मोसमी पाऊस दाखल होईल, असा अंदाज हवामान विभागाकडून देण्यात आला आहे. विदर्भाच्या काही भागात सध्या पूर्वमोसमी पाऊस होत आहे. राज्याच्या उर्वरित भागात हलक्या ते मध्यम स्वरूपाच्या पावसाची शक्याता कायम आहे. कोकणात मात्र दक्षिण भागात मोसमी पाऊस काही प्रमाणात जोर धरण्याची शक्यता आहे. मोसमी पावसाने सोमवारी मध्य महाराष्ट्राचा जवळपास सर्व भाग व्यापून मराठवाड्याचा बहुतांश भागांत प्रवेश केला होता. सध्या मोसमी पावसाने निम्मा महाराष्ट्र



व्यापला आहे. मोसमी पावसाच्या प्रवासाची प्रगती चांगली असली, तरी दाखल झालेल्या भागामध्ये पावसाचे प्रमाण मात्र कमी असल्याचे दिसून येत आहे. मंगळवारी मोसमी पावसाने कोणतीही प्रगती केली नसली तरी येत्या दोन दिवसात तो विदर्भातील काही भागात दाखल होईल, असा हवामान विभागाचा अंदाज आहे.

मोसमी पावसाचा १० जूनला दक्षिण कोकणातून महाराष्ट्रात प्रवेश झाला. दुसऱ्याच दिवशी ११ जूनला कोकण आणि पश्चिम महाराष्ट्रात प्रगती करीत थेट मुंबई-पुण्यापर्यंत धडक मारली. पालघर, ठाणे जिल्ह्यातही त्याने प्रवेश केला. १२ जूनला त्याचा प्रवास थांबला होता. १३ जूनला पुन्हा वेग घेत मोसमी पावसाने कोकणमधील सर्व भाग व्यापला. कोकण किनारपट्टीवरून तो थेट गुजरातमध्ये दाखल झाला. महाराष्ट्रामध्ये मराठवाड्यातील काही भाग आणि विदर्भात त्याची प्रगती अद्याप झालेली नाही. पुढील दोन ते तीन दिवसांत महाराष्ट्राबरोबरच बंगालच्या उपसागराच्या बाजूने मोसमी पाऊस प्रगती करणार आहे. या बाजूने तो बिहारपर्यंत पोहोचला असून सध्या पूर्वोत्तर भागासह हिमालयाच्या पायथ्यापर्यंत पाऊस होत आहे. मोसमी पावसाने रत्नागिरी, सिंधुदुर्ग, रायगड, पालघर, मुंबई, ठाणे, पुणे, सातारा, कोल्हापूर, नाशिक, जळगाव, धुळे, नगर, सोलापूर, सांगली, नंदूरबार, औरंगाबाद, उस्मानाबाद, परभणी, जालना, लातूर, बीड आदी जिल्ह्यांपर्यंत मजल मारली. हवामान विभागाच्या अंदाजानुसार पुढील दोन दिवसांत मराठवाड्यातील बहुतांश भाग व्यापून तो विदर्भात प्रवेश करण्याची शक्यता आहे.

## लोकार्पणापूर्वीच समृद्धी महामार्ग ठरतोय जीवघेणा !

साप्ता. अधिकारनामा

**बुलढाणा** : समृद्धी महामार्गावर लोकार्पणापूर्वीच धोकादायक वाहतूक सुरू आहे. त्यामुळे हा महामार्ग जीवघेणा ठरत आहे. बुलढाणा जिल्ह्यात समृद्धी महामार्गावर आतापर्यंत झालेल्या दोन अपघातात तिघांना आपला जीव गमवावा लागला. या महामार्गाचे काही टप्प्यातील काम पूर्ण झाले. मात्र, अद्याप त्याचे लोकार्पण करण्यात आलेले नाही. लोकार्पणाचा कार्यक्रम दोन वेळा स्थगित करून पुढे ढकलण्यात आला. निकृष्ट कामावरूनसुद्धा समृद्धी महामार्ग चर्चेत आहे. मेहकर येथील



काही व्यावसायिक औरंगाबाद येथून समृद्धी महामार्गावरून परत येत असताना त्यांच्या वाहनाला अपघात झाला. मुसळधार पाऊस सुरू झाल्याने तांदुळवाडी शिवारात चालकाचे वाहनावरून नियंत्रण सुटले. त्यामुळे वाहन महामार्गावरील दुभाजकाला आदळले आणि खड्ड्यात पडले. या भीषण अपघातात व्यावसायिक बळीराम खोकले यांचा मृत्यू, तर दोन जण गंभीर जखमी झाले. अपघातात कार अक्षरशः चक्काचूर झाली. यापूर्वी देखील बुलढाणा जिल्ह्यात समृद्धी महामार्गावर अपघात होऊन दोन बळी गेले होते.

## आदित्य ठाकरेंच्या अयोध्या दौऱ्यावर मनसेचा टोला

साप्ता. अधिकारनामा

**मुंबई** : शिवसेना नेते आणि राज्याचे पर्यावरणमंत्री आदित्य ठाकरे बुधवारी अयोध्या दौऱ्यावर जाणार आहेत. आदित्य ठाकरेंच्या अयोध्या दौऱ्यासाठी शिवसेनेकडून जय्यत तयारी करण्यात आली आहे. आदित्य ठाकरेंच्या आधी राज्यातील अनेक शिवसैनिक अयोध्येत दाखल झाले आहेत. आदित्य ठाकरे अयोध्या दौरा करणार असल्याने विरोधक त्यांना लक्ष्य करत असताना मनसेनेही टोला लगावला आहे. ढोंगी हिंदुत्वावरुन असली हिंदुत्वाकडे प्रवास सुरू होवो अशा शुभेच्छा मनसेने दिल्या आहेत. मनसे नेते गजानन काळे यांनी ट्वीट करत आदित्य ठाकरेंच्या अयोध्या





दौऱ्यावरुन टीका केली आहे. "अयोध्येला जाऊन रामलल्लाचे दर्शन घेऊन आल्यावर तरी यांचा ढोंगी हिंदुत्वावरुन असली हिंदुत्वाकडे प्रवास सुरू होवो. औरंगाबादचे नाव संभाजीनगर होवो, मशिदीवरचे भोंगे उतरो आणि रस्त्यावरचा नमाज बंद करण्याचे धाडस यांच्यात येवो. विधानपरिषदेत तरी एमआयएम व सपाची मदत न घेण्याची सुबुद्धी मिळो," असं गजानन काळे म्हणाले आहेत.

आदित्य ठाकरे यांच्या दौऱ्याआधी शिवसेनेचे खासदार संजय राऊत यांनी अयोध्याचा दौरा केला होता. आदित्य ठाकरे यांच्या दौऱ्याचे नियोजन करण्यासाठी संजय राऊत अयोध्येला गेले होते. त्यानंतर आता १५ जून रोजी आदित्य ठाकरे अयोध्येला जाणार असून सायंकाळी ५.३० वाजता ते श्रीरामाचे दर्शन घेणार आहेत. आदित्य ठाकरे यांच्यासोबत अयोध्येला जाण्यासाठी राज्यभरातून शिवसैनिक उत्तर प्रदेशकडे निघाले आहेत. आदित्य ठाकरे १५ जून रोजी सकाळी ११ वाजता लखनऊ विमानतळावर उतरतील. त्यानंतर दुपारी १.३० वाजता ते अयोध्येमध्ये जातील. येथे दुपारी ३.३० वाजता ते पत्रकार परिषद घेणार आहेत. या पत्रकार परिषदेत आदित्य ठाकरे काय बोलणार याकडे सर्वांचेच लक्ष लागले आहे.

## 'शिवसेना अयोध्येचा राजकीय फायद्यासाठी कधीच वापर करणार नाही' : संजय राऊत

साप्ता. अधिकारनामा

**मुंबई** : शिवसेना नेते आणि पर्यावरण मंत्री आदित्य ठाकरे अयोध्या दौऱ्यावर आहेत. अयोध्या ही सर्वांना उर्जा आणि प्रेरणा देणारी जागा आहे. त्यामुळे शिवसेना याचा कधीच राजकीय फायद्यासाठी वापर करणार नसल्याचे शिवसेना नेते संजय राऊत म्हणाले. आदित्य ठाकरे या अगोदरच अयोध्या दौऱ्यावर जाणार होते. मात्र, करोनामुळे हा दौरा पुढे ढकलण्यात आला होता. राष्ट्रवादी काँग्रेस अध्यक्ष शरद पवार हे देशातील अनुभवी नेते आहेत. राष्ट्रपती पदाच्या उमेदवारीसाठी मी शरद पवारांसोबत चर्चा केली. मात्र, त्यांनी राष्ट्रपती निवडणूक लढवणयासाठी नकार दिला असल्याचे राऊत म्हणाले. पण जर शरद पवारांनी मनावर घेतलं तर राष्ट्रपती पदासाठी त्यांच्या नावावर एकमत होऊ शकते असेही राऊत म्हणाले. 'देशाला राष्ट्रपती हवे असतील तर शरद पवार आहेत.अनेक रबर स्टॅम्प तर अनेक रांगेत आहेत. राष्ट्रपती पद कुणाला द्यायचे हे आता राज्यकर्त्यांवर अबलंबून आहे. उद्या १५ जून रोजी ममता बॅनर्जी ने राष्ट्रपती निवडणुकीबाबत चर्चा करण्यासाठी विरोधी पक्षांची बैठक बोलवली आहे. शरद पवार त्या उपस्थित राहणार आहेत. मात्र, महाराष्ट्राचे मुख्यमंत्री उद्धव ठाकरे या बैठकीला उपस्थित राहणार नसल्याचेही संजय राऊत म्हणाले.



काही लोकांना दुसऱ्याचं चांगले बघवत नाही, राज्याचे चांगले बघवत नाही. राज्यात कोणी काही चांगल करत असेल तर त्यात अडथळा आणण्याचे हेच त्यांच उद्धिष्ठ असतं. आणि ते यालाच हिंदुत्व समजतात, असे म्हणत राऊतांनी अप्रत्यक्षपणे भाजपाला टोला लगावला. भाजपाने राज्यसभा निवडणुकीत सहावी जागा जिंकली त्यात एवढं काही विशेष नाही, देशात हरणे आणि जिंकणे सुरुच असते. मी फक्त ४२ मतांच्या कोट्यावर निवडणुकीत उभा होतो. मलाही हरवण्याचा प्रयत्न करण्यात आला. माझे एक मत बाद झाले तरीपण मी जिंकलो असे राऊत म्हणाले.

## रायगड जिल्ह्यातील 3 हजार हेक्टर्स भातशेती नापीक

साप्ता. अधिकारनामा

**अलिबाग** : खारभूमी विभागाची उदासीनता रायगड जिल्ह्यातील शेतकऱ्यांच्या मुळावर उठली आहे. समुद्राला येणाऱ्या उधाणाचे पाणी भात शेतीत शिरून गेल्या काही वर्षांत जिल्ह्यातील ३ हजार ०१६ हेक्टर शेती कायमची नापीक झाली आहे. त्यामुळे खारभूमी क्षेत्रासाठी आपत्ती व्यवस्थापन आराखडा तयार करण्याची मागणी केली जाते आहे. कोकणातील समुद्रकिनारी आणि खाडीकिनारी असणाऱ्या शेतजमिनींना खारभूमी असे म्हणतात. समुद्राच्या उधाणांपासून या शेतजमिनींचे संरक्षण व्हावे यासाठी या जमिनींवर बंधारे घालण्यात येतात. याला खारबंदिस्ती असेही म्हणतात. पूर्वी या बांदिस्तीच्या देखभाल दुरुस्तीची कामे लोकसहभागातून केली जात असत. आता मात्र ही बांदिस्तीच्या देखभाल दुरुस्तीची कामे खारलँण्ड विभागाकडून केली जातात. रायगड जिल्ह्यात खारभूमी लाक्षक्षेत्रात येणारे एकूण २१ हजार २९६ हेक्टर क्षेत्र आहे.



यात अलिबाग तालुक्यातील ७ हजार ६१३ हेक्टर जमिनीचा समावेश आहे. यातील ३ हजार ०१६ हेक्टर जमीन उधाणाच्या पाण्यामुळे कायमची नापिक झाली आहे. माणकुळे, बहिरीचा पाडा, हाशिवरे, कावाडे, सोनकोठा, रांजणखार डावली, मेढेखार, देहेण कोटी यासारख्या गावांना खारबंदिस्तीची योग्य देखभाल न केल्याचा मोठा फटका बसला आहे.

## संपादकीय

# नड्डांची मुत्सद्देगिरी

नूपुर शर्मा यांनी नको त्या वेळी वादग्रस्त विधान करून पंतप्रधान मोदींच्या उत्साहावर पाणी फिरवलं आहे. केंद्रातील मोदी सरकारला आठ वर्ष पूर्ण होत असताना, पक्षाने मोदी उत्सव साजरा करायचा ठरवला असताना नूपुर शर्मा यांनी घोळ घातला. त्यामुळे आता परराष्ट्र खात्याची पळापळ सुरू आहे. कधी इराणची तर कधी सौदी अरेबियाची समजूत काढण्याचं काम करावं लागत आहे. नूपुर प्रकरण निस्तरण्यासाठी सरकारी स्तरावर जे काही करावं लागत असेल ते केलं जातंय, पण पक्ष म्हणून भाजपलाही काही तरी करावं लागणार होतं. भाजपचे अध्यक्ष जे. पी. नड्डा यांनीही मुत्सद्देगिरी करायचं ठरवलेलं दिसतंय. शनिवारी नड्डांनी काही देशांचे राजदूत, उच्चाधिकारी यांची भेट घेतली. गेल्या आठवडय़ातही त्यांच्या भेटीगाठी झाल्या होत्या. जूनमध्येच आणखी दोन बैठका होणार आहेत. वेगवेगळय़ा देशांच्या सरकारी प्रतिनिधींच्या बौद्धिक बैठका भाजप आणि संघाकडून अधूनमधून घेतल्या जातात. आत्ता नड्डांच्या बैठकांनी वेळ अचूक साधलेली आहे. या बैठका पूर्वनियोजित होत्या, त्या नूपुर प्रकरणामुळे आयोजित केल्या गेलेल्या नाहीत, पण आता या बैठकांचा वापर नूपुर प्रकरणामुळं झालेलं नुकसान भरून काढण्यासाठी केला जात आहे. देशांचे राजदूत बदलत असतात, नव्या राजदूतांना वा राजनैतिक अधिकाऱ्यांना भाजप म्हणजे काय हे समजावून सांगितलं पाहिजे, त्यांना भाजप आणि संघाबद्दल अधिकाधिक माहिती दिली तर पूर्वग्रह दूर करता येऊ शकतात, हे उद्देश बाळगून त्यांचं बौद्धिक घेतलं जातं. नूपुर प्रकरणानंतर या राजदूतांना भाजपचा धर्म-संस्कृती, परंपरा याबद्दल दृष्टिकोन काय हे समजावून सांगितलं जाणार आहे. देशात सर्व धर्माचा आदर केला जातो, हे सरकारी स्तरावर परराष्ट्र खाते देशांना समजावून सांगत आहे, तेच नड्डा या बैठकीतून करणार आहेत.

राष्ट्रपतीपदाच्या निवडणुकीची तारीख केंद्रीय निवडणूक आयोगाने जाहीर केल्यापासून भाजपने इतक्या नेत्यांची नावे चर्चेत ठेवली आहेत की, नेमके किती राष्ट्रपती निवडायचे आहेत असाच प्रश्न कुणालाही पडावा. मोदी-शहांनी भाजपवर आपली पकड बसवल्यानंतर समोरच्यांना गाफील ठेवायचं आणि मग, अचानक असे निर्णय घेऊन टाकायचे की, सगळे अचंबित होऊन जातील, अशीच कामाची पद्धत ठेवली आहे. रामनाथ कोविंद राष्ट्रपती होणार असं कोणाला स्वप्नात तरी वाटलं होतं का? पण, ते झाले. राज्यसभेचे सदस्य असताना त्यांच्या शेजारी बसणाऱ्या सदस्यांनाही कोविंद कोण हे कदाचित माहीत नसावेत. त्यामुळे ध्यानीमनी नसलेली व्यक्ती अचानक राष्ट्रपती पदावर बसेल, असं या वेळीही होऊ शकते. बऱ्याच नावांची चर्चा असली तरी, प्राधान्य महिला उमेदवाराला आणि आदिवासी समाजातील भाजप नेतृत्वाला दिलं जाण्याची शक्यता मांडली जाते आहे. प्रत्यक्षात जे काही होईल ते होईल, पण भाजपमधील एक व्यक्ती राष्ट्रपती होण्याची आतुरतेने वाट पाहात आहे ती म्हणजे व्यंकय्या नायडू. नायडू राज्यसभा एखाद्या शाळामास्तराप्रमाणं चालवतात, सदस्यांना विद्यार्थी समजून त्यांना डाफरतात, त्यांना शिस्त लावण्याचा प्रयत्न करतात. हे शाळामास्तर राष्ट्रपती झाले आणि पंतप्रधानांनाच विद्यार्थी समजायला लागले तर कसं होणार..? खरं तर मोदींचं आणि नायडूंचं फारसं सख्य नाही. नायडू मोदींच्या सरकारात मंत्री होते तेही नाइलाजाने. नवा चमू बनवायचा असल्यानं मोदींनी त्यांना उपराष्ट्रपती केलं आणि सरकार-पक्ष या दोन्हीपासून कोसो लांब ठेवलं. पण पंतप्रधानांचा हा सूचक इशारा लक्षात घेऊन नायडू काही शांत राहायला तयार नाहीत. ते प्रसारमाध्यमांतून, देशभरातील कार्यक्रमांतून लोकांच्या नजरेत राहतात. पण तुम्ही काहीही न करता अनेकांच्या नजरेत येऊ शकता आणि त्यातून लाभ होण्यापेक्षा नुकसानच हाती लागतं, हा अनुभव नायडूंनी नुकताच घेतला. उपराष्ट्रपती म्हणून ते कतारला गेले तर नेमके तेव्हाच भाजपच्या वादग्रस्त प्रवक्त्या नूपुर शर्मा यांची कीर्ती देशोदेशी पसरली, त्या कतारमध्येही नावारूपाला आल्या. नूपुर यांनी वादग्रस्त विधान करावं, त्याचे पडसाद उमटावेत, आणि त्याच वेळी नायडूंनी कतारमध्ये सरकारी पाहुणे म्हणून जावं हा केवढा योगायोग.. नायडू तिथं गेले अन् कतारनं नूपुर प्रकरणावरून आपली नाराजी व्यक्त केली. तिथल्या अमिरानं नायडूंचा भोजन समारंभच रद्द करून टाकला. कावळा फांदीवर बसायला अन् ती तुटायला एकच गाठ पडणं या म्हणीचाच हा प्रत्यय.. आता नायडूंनी उपराष्ट्रपतीपदाचा आधीचा कार्यकाळ लक्षात ठेवायचा, की हा शेवटचा हा अनुभव लक्षात ठेवायचा?

काँग्रेसच्या हंगामी अध्यक्ष सोनिया गांधी आणि नेते राहुल गांधी यांना सक्तवसुली संचालनालयाने चौकशीसाठी बोलावलेलं आहे. सोनिया गांधींना करोनाचा संसर्ग झाल्यामुळं त्यांची चौकशी नंतर होईल, पण राहुल गांधी सोमवारी चौकशीला सामोरे जातील. गांधी कुटुंबातील सदस्य चौकशीला जाण्याआधीच काँग्रेसने शक्तिप्रदर्शनाची तयारी केलेली आहे. काँग्रेसने सर्व खासदारांना सोमवारी दिल्लीत हजर राहण्याची सूचना दिलेली आहे. २०१५ मध्येदेखील सोनिया आणि राहुल हे नॅशनल हेराल्ड प्रकरणात जामिनासाठी न्यायालयात गेले होते. त्यांना जामीन मिळाल्यानंतर त्यांचं काँग्रेसच्या मुख्यालयात जोरदार स्वागत झालेलं होतं. त्याचीच पुनरावृत्ती आताही होण्याची शक्यता आहे. हे शक्तिप्रदर्शन होईलच, पण काँग्रेसने देशभर 'ईडी'च्या कारवायांची पोलखोल करण्यासाठी पत्रकार परिषदा घेण्याचं ठरवलेलं आहे. लोकांशी संवाद साधण्यासाठी काँग्रेस 'भारत जोडो' मोहीम राबवणार असून २ ऑक्टोबरला कन्याकुमारीपासून यात्रा सुरू होईल. त्याची राहुल गांधींच्या उपस्थितीत तयारी केली जात आहे. आणि तरीही महासचिवांच्या आणि प्रदेशाध्यक्षांच्या बैठका घेऊन शक्तिप्रदर्शन करूनच काँग्रेसला पक्षाची ताकद दाखवायची आहे. भाजपच्या केंद्रीय नेतृत्वानं नूपुर शर्मावर केलेल्या कारवाईमुळं भाजपमध्ये नाराजी आहे, हे लपून राहिलेलं नाही. भाजपच्या अनेक नेत्यांनी जाहीरपणे नूपुर शर्मा यांचं समर्थन केलं होतं, पण मोदी-शहांच्या नजरेत भरण्यापेक्षा गप्प राहावं असा व्यावहारिक विचार करून त्यांनी तलवारी म्यान केलेल्या आहेत. त्यात प्रवक्त्यांची फार कोंडी झाली आहे. दोन-चार दिवसांपूर्वी भाजपनं नवी मार्गदर्शक सूची प्रवक्त्यांच्या हातात दिली. धर्म आदी संवेदनशील विषयांवर भाष्य करायचं नाही वा भाष्य करताना भान राखायचं; मोदींच्या विकासाच्या योजनांवरच बोलायचं; प्रसारमाध्यमांशी बोलताना पक्षाची परवानगी घ्यायची; एखाद्या विषयावर काय बोलायचं, काय बोलायचं नाही हे पक्षाला विचारून ठरवायचं.. खरं तर या सूचनांमध्ये नवं काहीच नाही. कुठल्याही पक्षाच्या प्रवक्त्याला खबरदारीच्या याच सूचना दिलेल्या असतात. भाजपनं आपल्या प्रवक्त्यांना विशेष बाब म्हणून सूचना दिल्यानं त्याची नाहक चर्चा झाली. एरवीही विषय आणि त्याचं राजकीय गांभीर्य लक्षात घेऊन काय भूमिका घ्यायची आणि काय बोलायचं हे निश्चित केलेलं असतं. पक्षाच्या माध्यम विभागातील समन्वयक-प्रमुख प्रवक्त्यांशी संपर्क साधून विषयाची चौकट निश्चित करत असतात. पक्षाने ठरवून दिलेल्या चौकटीत प्रवक्त्याने बोलणं अपेक्षित असतं. नूपुर शर्मा यांनीही भाजपची ही चौकट मोडली नव्हती, अशी चर्चा होत होती, पण आता या प्रसंगानंतर तेजस्वी सूर्यासारख्या फायरब्रॅण्ड नेत्यांचं कसं होणार, या नेत्यांनाही तलवार म्यान करावी लागणार का, असेही विचारले जात होते. तेजस्वी सूर्या नुकतेच ऑस्ट्रेलियाला जाऊन आले. तिथं त्यांना 'नूपुर प्रकरणा'नं गाठलं. त्यांनीही आधी इथे भारतात इस्लाम, हलाल अशा वेगवेगळय़ा गोष्टींवर टिप्पणी केली होती. मुस्लिमांच्या घरवापसीचाही विचार बोलून दाखवला होता. ते देशाबाहेर जाण्याआधीच त्यांची मतं सातासमुद्रापार पोहोचली. तिथे ऑस्ट्रेलियात त्यांच्याविरोधात निदर्शनं झाली. बोलताना थोडा संयम बाळगा, असं आता भाजपकडून सगळय़ांनाच सांगितलं जातंय, पण कोणीच बहुधा ऐकत नसावं. नूपुर शर्मा यांनाही सबुरी दाखवण्याचा सल्ला दिला होता, पण त्यांनी ऐकलं नाही. मग महाभारत घडलं..

# आता तर जगानेही सावध केले आहे!


नूपुर शर्मा आणि नवीन जिंदाल जे काही बोलले त्यात खरे तर आश्चर्य वाटण्याजोगे काय आहे? ते दोघेही त्यांच्या पक्षाचे निष्ठावान कार्यकर्ते आहेत. त्यांच्या नेत्यांच्या भाषणांमधून आजवर सांगितल्या गेलेल्या गोष्टीच तर त्यांनी निष्ठावान अनुयायी उचलतात तशा मनःपूर्वक उचलल्या आहेत. फ्रान्सिस बरॉड हा चित्रकार लिव्हरपूलचा. मार्क या त्याच्या भावाचा मृत्यू झाला. मार्कचा फोनोग्राफ प्लेयर, त्याच्या आवाजातील काही रेकॉर्डिंग्ज आणि मार्ककडे असलेला फॉक्स टेरियर जातीचा निपर नावाचा कुत्रा या सगळय़ा गोष्टी फ्रान्सिसकडे आल्या. भावाची आठवण म्हणून मार्क या गोष्टी सतत जवळ बाळगायचा. तो मार्कच्या आवाजातील रेकॉर्ड वाजवायचा, तेव्हा निपर धावत यायचा. आपल्या मालकाचा आवाज येतोय आणि तो दिसत नाहीये म्हणून तो गोंधळून जायचा आणि तो आवाज कुठून येतो आहे, ते समजावे म्हणून अगदी कान देऊन ऐकत बसायचा. फ्रान्सिस जातीचा चित्रकार.. त्याने हे दृश्य रंगवले आणि त्या चित्राला 'हिज मास्टर्स व्हॉइस' असे शीर्षक दिले. ग्रामोफोन कंपनीने १८९९ मध्ये हे पेंटिंग १०० पौंडांना विकत घेतले आणि त्याचा लोगो केला. हा लोगो इतका लोकप्रिय झाला की, आठ वर्षांनंतर कंपनीने तिचे नाव बदलून एचएमव्ही केले. निपरच्या स्मृती २०१४ मध्ये लंडनमध्ये नीलफलकावर जपल्या गेल्या. गेल्या आठवडय़ात, जेव्हा मी वाचले की भाजपच्या दोन प्रवक्त्यांवर शिस्तभंगाची कारवाई करण्यात आली आहे (नूपुर शर्मा यांना पक्षातून निलंबित करण्यात आले आणि नवीन कुमार जिंदल यांना पक्षातून काढून टाकण्यात आले), तेव्हा मला निपरची गोष्ट आठवली. मला नूपुर आणि नवीन या दोघांविषयी लिहायचे आहे, पण त्यांचा कोणताही अनादर करायचा नाही, हे कृपया लक्षात घ्या. तर ५ जून रोजी नूपुर यांना एक पत्र मिळाले. त्यात म्हटले होते, "तुम्ही विविध विषयांवर पक्षाच्या भूमिकेच्या विरुद्ध मत व्यक्त केले आहे." या वाक्याने मला आश्चर्य वाटलेच, शिवाय भारताचे नागरिक असलेल्या मुस्लीम तसेच ख्रिश्चन धर्मीयांबाबतीत भाजपची भूमिका नेमकी काय आहे असा प्रश्नही पडला.



नूपुर आणि नवीन हे भाजपचे निष्ठावान अनुयायी आहेत आणि त्यांचे नेते जे काही म्हणतात, ते हे दोघेही लक्षपूर्वक ऐकतात. तुमच्यासारख्या अनेकांप्रमाणे नूपुर आणि नवीन निरीक्षण करतात, वाचन करतात आणि श्रवण करतात. उदाहरणार्थ, २०१२ च्या गुजरातमधील निवडणुकीच्या प्रचारात नरेंद्र मोदींनी केलेले भाषण त्यांनी ऐकले असणार. त्यात मोदी म्हणाले होते की, "आपण पाच कोटी गुजराती लोकांचा स्वाभिमान आणि मनोबल उंचावले, तर अली, माली आणि जमालींच्या योजना आपले काहीही नुकसान करू शकणार नाहीत." पण हे ऐकताना या दोघांना हे प्रश्न पडले असतील का, की अली, माली आणि जमाली हे कोण आहेत? 'आम्ही' म्हणजे नेमके कोण? आणि 'आपले' नुकसान होईल अशा योजना अली, माली आणि जमाली का काढतील? उत्तर प्रदेशच्या विधानसभा निवडणुकीच्या वेळी २०१७ मध्ये 'सब का साथ, सब का विश्वास' हा नारा देताना पंतप्रधानांनी आपल्या भाषणात त्याबद्दलची भूमिका मांडली होती. तेव्हा ते म्हणाले होते, "तुम्ही एखाद्या गावात कब्रस्तान (मुस्लिमांची दफनभूमी) तयार केले तर स्मशानही (हिंदुंची स्मशानभूमी) तयार केले पाहिजे. या बाबतीत कोणताही भेदभाव नसावा." त्यांच्या या शब्दांनी नूपुर आणि नवीन या दोघांवरही सखोल परिणाम केला असावा. ११ एप्रिल २०१९ रोजी गृहमंत्री अमित शहा आपल्या भाषणात जे म्हणाले, तेदेखील या दोघांनी ऐकले असावे. अमित शहा म्हणाले होते, "आम्ही संपूर्ण देशात एनआरसीची (नॅशनल रजिस्टर ऑफ सिटिझन्स) अंमलबजावणी करू. आम्ही बौद्ध, हिंदु आणि शीख वगळता प्रत्येक घुसखोराला देशातून काढून टाकू. घुसखोरांना देशाबाहेर काढण्याची प्रतिज्ञा भाजपने केली आहे. बेकायदेशीर पद्धतीने देशात घुसखोरी करणारे लोक हे वाळवीसारखे असतात. गरिबांसाठी असलेले धान्य ते खातात, नोकऱ्या बळकावतात." हे सगळे ऐकून तेव्हा नूपुर आणि नवीन यांची अगदी खात्री पटली असेल की आपण योग्य व्यक्तीने योग्य ठिकाणी उच्चारलेले योग्य शब्द ऐकत आहोत.

१५ डिसेंबर २०१९ रोजी, झारखंडमधील एका निवडणूक रॅलीत आपले पंतप्रधान म्हणाले होते की, "गडबड करणारे 'लोक' त्यांच्या कपडय़ांवरून ओळखता येतात." नूपुर आणि नवीन यांनी ते भाषण बहुधा ऐकले असेल आणि लोकांना त्यांच्या कपडय़ांवरून ओळखण्याचा संकल्प केला असेल. उत्तर प्रदेश विधानसभेच्या निवडणुकीच्या प्रचारादरम्यान, मुख्यमंत्री आदित्यनाथ वारंवार म्हणत होते की, "स्पर्धा आता खूप पुढे गेली आहे. लढत आता ८० विरुद्ध २० अशी आहे. नूपुर आणि नवीन यांनी हे शब्ददेखील नक्कीच ऐकले असतील आणि '२० टक्के' शत्रू कोण हे त्यांच्या जाणिवेत पक्के बिंबले गेले असेल. मुस्लिमांबद्दलच्या भाजपच्या भूमिकेबद्दल कोणालाही शंका नाही. एम. एस. गोळवलकर (गुरुजी) यांच्या लिखाणात त्याचे धागेदोरे सापडतात. भाजपला देशात, देशाच्या संसदेत तसेच विधिमंडळात मुस्लीम नको आहेत. संसदेच्या दोन्ही सभागृहांत भाजपच्या ३७५ खासदारांमध्ये या महिन्याच्या अखेरीस एकही मुस्लीम खासदार असणार नाही. ४०३ जागा असलेल्या उत्तर प्रदेशच्या विधानसभा निवडणुकीत किंवा १८२ जागा असलेल्या गुजरात विधानसभा निवडणुकीत भाजपने एकही मुस्लीम उमेदवार उभा केला नाही. ११ राज्यांमध्ये भाजपचे मुख्यमंत्री आहेत, पण फक्त एकाच मुस्लीम व्यक्तीला भाजपने मंत्रीपद दिले आहे. जून २०१२ मध्ये निवडणूक आयुक्त म्हणून एस. वाय. कुरैशी निवृत्त झाले तेव्हापासून एकाही मुस्लीम अधिकाऱ्याची निवडणूक आयुक्त म्हणून नेमणूक झाली नाही. अर्थात ही उदाहरणे एवढीच नाहीत. त्यांची यादी मोठी आहे. माझ्या मते, नूपुर शर्मा आणि नवीन कुमार यांनी विविध मुद्दय़ांवर भाजपची भूमिका इमानदारीत मांडली. पक्ष आणि पक्षप्रमुख हे त्यांचे एचएमव्ही- हिज मास्टर्स व्हॉइस आहेत. त्यांनी आपल्या मास्टरचा आवाज ऐकला, त्याचे म्हणणे समजून घेतले आणि ते आपापल्या पद्धतीने बोलले. भाजप ही आधुनिक भारताची ग्रामोफोन कंपनी आहे.

## बुकमार्क : 'ते' पुन्हा येतात..




आपल्याला प्लेग बऱ्यापैकी माहीत असतो परंतु मानमोडीची साथ भारतात, महाराष्ट्रात कधीतरी आली होती हे आपण कधीही ऐकले व वाचलेले नसते आणि म्हणूनच भारतासह जगास करोनाच्या साथीने बेसावध पकडले. ते कसे, हे समजून घेण्यासाठी 'द एज ऑफ पँडेमिक्स १८१७-१९२० : हाऊ दे शेप्ड इंडिया अँड द वर्ल्ड' हे चिन्मय तुंबे लिखित पुस्तक 'वाचलेच पाहिजे' अशा पुस्तकांच्या यादीतील ठरते! एवढीच पार्श्वभूमी असती तर या पुस्तकाबद्दल लिहिण्याची मी तसदी घेतली नसती, परंतु मंकीपॉक्सचे रुग्ण अनेक देशांमध्ये आढळून येत आहेत. टोमॅटो फ्लूचे रुग्ण केरळमध्ये आढळून आले, आणि वेस्ट नाईल विषाणूची चर्चा केरळमध्ये सुरू आहे. तर ज्या करोनाचा अध्याय संपला असे समजून आत्ता कुठे आयुष्य पूर्वपदावर येत आहे त्याचवेळी करोनाच्या 'बी४' आणि 'बी५' या आवृत्त्या भारतात आढळत आहेत. एकविसाव्या शतकात आपण तिसऱ्या दशकाच्या सुरुवातीवरच असताना या शतकातील तिसऱ्या रोगाच्या जागतिक महासाथीची (पँडेमिक) घोषणा करावी लागते की काय अशा परिस्थितीत जागतिक आरोग्य संघटना (डब्लूएचओ) असताना हे पुस्तक समजावून घेणे अतिशय महत्त्वाचे वाटते. या पुस्तकात चिन्मय तुंबे यांनी एकोणिसाव्या व विसाव्या शतकात जागतिक साथीचे जे रोग आले त्यांचा इतिहास रंजकपणे सांगण्याचा प्रयत्न केला आहे. या महासाथींनी आजच्या जगाला, विशेषतः भारताला आकार देण्यात महत्त्वाची भूमिका कशी पार पाडली यावरही प्रकाश टाकला आहे. या पुस्तकातून विज्ञानाच्या प्रगतीबरोबरच विविध रोगांच्या कारणांचा शोध घेत असताना वैद्यकीय विज्ञानाची व त्यातल्या शाखा-उपशाखांची प्रगती कशी झाली हे समजते. नुसता इतिहास सांगून हे पुस्तक थांबत नाही तर शासन-प्रशासन व समाज म्हणून, मागील महासाथींची सामूहिक स्मृती नष्ट झाल्यामुळे करोना साथीला सामोरे जाताना कशा अनेक चुका झाल्या, ज्या टाळता येण्याजोग्या होत्या याची सोदाहरण उजळणी लेखक करतो. बदलते हवामान, जागतिक तापमान वाढ व अन्य बाबींचा विचार करता करोना ही जागतिक साथ शेवटची नसेल हे स्पष्टच आहे. त्यामुळे या महासाथींनी जी शिकवण आपल्याला दिली त्याची सामूहिक स्मृती जतन करणे हे येणाऱ्या महासाथींना सक्षमपणे सामोरे जाण्यासाठी आवश्यक असल्याचे तुंबे दाखवून देतात. सन १८१७ ते १९२० हा सुमारे शंभर वर्षांचा कालखंड जागतिक महासाथींचा कालखंड होता. या काळात साथीच्या रोगांनी जगभरातील सात कोटी लोकांचा बळी घेतला. त्यामध्ये चार कोटी लोक एकटया भारतातील होते!

# राखीव मार्गिकांचे खात्रीशीर गणित

विजेवर चालणाऱ्या बस ताफ्यात दाखल करून घेण्याचा बेस्टचा निणर्य स्वागतार्ह आहे. मात्र या बसचा आर्थिकदृष्टया आणि एकंदर वाहतूक व्यवस्थेत सुधारणा करण्यासाठी पुरेपूर फायदा करून घ्यायचा असेल, तर त्या कुठेही वापरण्यापेक्षा 'बस लेन' स्वरूपात वापरणे म्हणजेच या बससाठी राखीव मार्गिका ठेवणे गरजेचे आहे. विद्युत बसची किंमत इतर बसपेक्षा दुपटीहून अधिक आहे. त्या पूर्णपणे 'बस रॅपिड ट्रान्समिट सिस्टीम' (बीआरटीएस) पद्धतीने चालवणे म्हणजेच या बससाठी स्वतंत्र मार्ग ठेवणे आता शक्य नाही. या बससाठी पश्चिम द्रुतगती मार्गाची निवड स्वाभाविक ठरते, कारण या २३ किलोमीटर लांबीच्या रस्त्यावर किमान ४-४ मार्गिका आहेत. मार्गाच्या मधोमध सुमारे ११ उड्डाणपूल आहेत आणि ते निम्म्याहून अधिक जागा व्यापतात, मात्र मार्गाच्या ब्याच भागात दुतर्फा सेवा रस्ते आहेत. या मार्गावर १९ तास मोठय़ा प्रमाणावर वाहतूक सुरू असते. त्यामुळे या राखीव बस मार्गिकेचा पुरेपूर वापर करून घेता येऊ शकतो. दोन्ही बाजूंना एक मार्गिका बससाठी राखीव ठेवल्यास इतर मार्गिकांवरील गर्दी कमी होण्यास मदत होऊ शकते. एमएमआरडीएने पश्चिम द्रुतगती मार्गावरील वाहतुकीचे मोजमाप करावे, अशी मागणी अनेकदा होऊनही अद्याप त्यादृष्टीने पावले उचलण्यात आलेली नाहीत. मेट्रो २ ए आणि मेट्रो ७ हे मार्ग दोन महिन्यांपूर्वी सुरू करण्यात आले. मेट्रोला अद्याप फार प्रतिसाद मिळालेला नाही. चार लाखांहून अधिक प्रवासी दररोज मेट्रो वापरतील, असा अंदाज होता. दिवसाला सुमारे ३० हजार प्रवासी ही मेट्रो वापरतात. आम्ही २०१५ आणि २०१७ साली वाहतूक गणना केली तेव्हा आढळले की ताशी सुमारे चार हजार ४०० मोटारगाडय़ा, दोन हजार दुचाकी, एक हजार ७०० रिक्षा, एक हजार २०० टॅक्सी सायंकाळी उत्तरेच्या दिशेने जातात. या उलट ११० बसचा वापर होतो. त्यापैकी बेस्टच्या सुमारे ५० गाडया असतात. खासगी वाहनांनी जाणाऱ्या प्रवाशांची संख्या १५ हजार तर बेस्टने प्रवास करणाऱ्यांची संख्या सुमारे एक हजार ५०० एवढी आहे. थोडक्यात सार्वजनिक वाहतुकीचे प्रमाण साधारण १० टक्के आहे.

बस मार्गिकेचा परिणामकारक वापर केला तर सुमारे ९० ते १०० बसमधून पाच हजार प्रवासी प्रवास करू शकतील. बसचा वेग १५ ते २० टक्के वाढवता येईल. हा राखीव बसमार्गिकेचा खास फायदा आहे. शिवाय बस मार्गिकेखेरीजच्या मार्गिकांवरील ताण कमी होऊन तिथेही वाहतूक अधिक सुरळीत आणि जलद होते. खासगी वाहनाने प्रवास करणाऱ्यांपैकी किमान १० ते १५ टक्के लोक बस मार्गिकेने जाऊ लागले, तरी वाहतूककोंडी कमी होईल आणि त्याचा मोटारींनी जाणाऱ्यांपैकी ८०-९० टक्के प्रवाशांना फायदा होईल. जे प्रवासी बसचा पर्याय स्वीकारतील, त्यांचा प्रवासावरील खर्च खूपच कमी होईल. शिवाय वाहन पार्क कुठे करावे, या भीषण प्रश्नातूनही सुटका होईल. जसजसा बस मार्गिकेचा पर्याय लोकप्रिय होईल, तसा दोन्ही प्रकारच्या प्रवाशांना फायदा होईल. अत्यंत कमी खर्चात आणि कमी वेळात हा मोठा प्रकल्प पार पाडता येईल. मेट्रो एके मेट्रो असा विचार न करता मुंबईतील वाहतूककोंडी सोडवण्यासाठी राखीव बस मार्गिकेसारखे इतर पर्याय विचारात घेणे आवश्यक आहे. सुरुवातीला निदान प्रयोग म्हणून तरी हा प्रयत्न करणे आवश्यक आहे. २०१६ मध्ये तीन महिने बीकेसी मार्गावर प्रायोगिक तत्त्वावर एक मार्गिका बससाठी राखीव ठेवण्यात आली होती. तिला प्रवाशांचा उत्तम प्रतिसाद लाभला. शिवाय इतर तीन मार्गिकांवर इतर मोटारगाडया शिस्तीत चालल्या. या प्रयोगादरम्यान बसमधील प्रवाशांमध्ये सुमारे दुपटीने वाढ झाली आणि वाहतूककोंडीची समस्याही सुटली.

हाच प्रयोग पश्चिम द्रुतगती मार्गावर खासकरून गर्दीच्या तासांत हमखास शक्य आहे. विजेवर चालणाऱ्या सुमारे ४०० बस वापरल्या आणि त्या किमान २० टक्के अधिक वेगाने चालवल्या, तर ३० टक्क्यांहून अधिक प्रवासी प्रवास करू शकतील आणि ४० टक्के अधिक उत्पन्न मिळविणे शक्य होईल. शिवाय इतर मोटारीसुद्धा अधिक वेगाने चालविणे शक्य होईल. राखीव बस मार्गिकेचे फायदे अनेक आहेत. एकदा मार्गाची आखणी केल्यावर सुमारे तीन महिन्यांत मार्गिका सुरू होऊ शकते. सुरू झाल्यावर तिच्यात गरजेनुसार सुधारणा करता येतात. कमी गर्दीच्या वेळी ताशी ५०-६० बस सोडता येतात. गर्दीच्या वेळी हा आकडा तशी १२० पर्यंत नेता येतो. या मार्गाला आणखी दोन फाटे संभवतात. बीकेसीमधून सुरू होऊन एक फाटा सरळ दहिसर, भाईंदपर्यंत जाईल. दुसरा फाटा एससीएलआरवरून पूर्वेला चेंबूरमार्गे वाशीपर्यंत आणि पश्चिमेला अंधेरीहून लोखंडवालामार्गे जाऊ शकेल. कोणत्याही परिस्थितीत कोणालाही बस थांब्यावर दोन मिनिटांहून अधिक काळ थांबण्याची गरज नाही. अशा मार्गिकेचे आणखीही काही फायदे आहेत. रेल्वे किंवा मेट्रोप्रमाणे बसने प्रवास करण्यासाठी जिने चढावे- उतरावे लागणार नाहीत. शिवाय बस थांब्यावर पोहोचण्यासाठी फार चालावेही लागणार नाही. या बस साधारणपणे आपल्याला मुक्कामाच्या अधिक जवळ पोहोचवतात. अन्य वाहनांचा अडथळा येत नाही, त्यामुळे वाहनचालकाचे काम सोपे होते. प्रदूषण नाही, वातानुकूलित प्रवासाचे सुख, मेट्रोच्या निम्मे भाडे आणि सरकारला तोटाही मेट्रोपेक्षा खूपच कमी. एवढे सगळे फायदे असणाऱ्या या पर्यायाचा स्वीकार करण्यास काय हरकत आहे? इथे मेट्रोला विरोध करण्याचा उद्देश नाही, मात्र वाहतुकीच्या निरनिराळया पर्यायांतून सर्व दृष्टींनी योग्य पर्याय निवडण्याचा विवेक राखला पाहिजे. बस मार्गिका हा एक अतिशय सोपा, स्वस्त आणि झटपट अमलात येऊ शकणारा पर्याय आहे.

मी २००२ मध्ये बोगोटा या शहरातील प्रयोगाविषयी ऐकले होते आणि हा पर्याय अतिशय प्रभावी ठरेल, असे वाटले होते. पुढे बोगोटा, गवांगझोऊ, इस्तंबूल, लंडन आणि ऑकलंडमधील बीआरटीएस किंवा बस मार्गिका पाहिल्या तेव्हा खात्रीच झाली की मुंबईसारख्या अतिशय दाट लोकवस्तीच्या शहरासाठी बीआरटीएस किंवा स्वतंत्र बस मार्गिका हा योग्य पर्याय ठरतो. २००५ मध्ये एमएमआरडीएने रस्त्यांच्या मधोमध दुतर्फा जाणाऱ्या बीआरटीएसच्या पर्यायाचा विचार केला होता. उड्डाणपुलामुळे तो पर्याय मागे पडला, मात्र २०१६ मध्ये बीकेसीत केलेला प्रयोग अतिशय यशस्वी ठरला. त्यामुळे आता बेस्ट, महानगरपालिका आणि एमएमआरडीएने पश्चिम द्रुतगती मार्गासाठी या कमी खर्चाच्या पर्यायाचा गांभीर्याने विचार करावा. या प्रकल्पासाठीचा खर्च मेट्रोच्या तुलनेत अतिशय किरकोळ आहे, शिवाय अपेक्षित परिणाम साधता आला नाही, तर प्रकल्प एका आठवडयात बंदही करता येऊ शकेल. मेट्रो २ आणि ७ ला फारसा प्रतिसाद मिळाला नाही, तर मात्र प्रचंड खर्च वाया जाऊ शकतो. मुंबई शहरातील वाहतुकीचे प्रश्न सोडवताना आजवर या पर्यायाचा फारसा विचार केला गेला नाही. ही चूक सुधारणे अजूनही शक्य आहे. हा प्रकल्प सहा महिन्यांत आणि बस खरेदीचा खर्च वगळता अवघ्या ४० ते ५० कोटी रुपयांत सुरू करता येईल. त्यामुळे त्याकडे दुर्लक्ष केले जाऊ नये. अन्यथा विजेवर चालणाऱ्या दुप्पट किमतीच्या बस मोठया संख्येने घेऊन त्यांचा फारसा फायदा होणार नाही. राखीव बस मार्गिकांचे गणित खात्रीशीर आहे.

## अग्रलेख : काय काय नाकारणार?

पर्यावरण मूल्यांकन निर्देशांकात भारतास 'तळा-गाळात' पाठवणारा पाहणी अहवाल आपणास मान्य नाही, हे नैसर्गिक म्हणायचे. जगाने आपले फक्त गुणगान करावे, आमच्यात दोष नाहीतच, असले तर आमचे आम्ही पाहून घेऊ ही आपली आंतरराष्ट्रीय राजनीती. तेव्हा हा अहवाल नाकारणे ओघाने आलेच. या पाहणीत हवेची शुद्धता, वायुप्रदूषण, पाणी व त्याचा दर्जा, स्वच्छता, जैवविविधता जतन, जलस्रोतांचे नियमन, कचऱ्याचे व्यवस्थापन, अपारंपरिक ऊर्जा, जलवायू परिवर्तन, कार्बन उत्सर्जन या साऱ्या महत्त्वाच्या मानकांमध्ये भारताची कामगिरी अतिशय सुमार दर्जाची आढळली. पर्यावरण स्वास्थ्य, परिसंस्थात्मक स्थिरता व हवामान बदल हे या अहवालातले तीन महत्त्वाचे घटक. यापैकी पहिल्या व दुसऱ्यात आपण १७८ व्या स्थानावर. आपल्याखाली कोण? तर पाकिस्तान व मार्शल आणि सॉलोमन बेटे हे देश. अनेकदा आपल्यापेक्षा खालच्या क्रमांकावर कोण यावर आपण समाधानाचे मोजमाप ठरवत असतो. इथे तर तीही सोय उरली नाही. तिसऱ्या घटकात भारत १६५ व्या स्थानावर. या अहवालातली उत्तम कामगिरी म्हणाल तर हीच. बाकी सर्व ठिकाणी तळाचा म्हणजे १८० वा क्रमांक कायम. दर दोन वर्षांनी प्रसिद्ध होणाऱ्या या अहवालात निर्देशांक निश्चितीसाठी या वेळी प्रथमच चाळीस मानकांचा वापर झाला. या कसोटीवर उतरले ते डेन्मार्क, फिनलँड व ब्रिटन. पर्यावरण रक्षणाच्या मुद्दयावर सातत्याने नवनवे प्रयोग करणाऱ्या डेन्मार्कने विकसित केलेले तंत्रज्ञान साऱ्या जगाला मोफत देण्याची तयारी आधीच दर्शवली. त्यानुसार कार्बन उत्सर्जनात आघाडीवर असलेल्या, भारतासह १९ देशांनी डेन्मार्कशी करारही केला आहे. तरीही या देशांची कामगिरी सुधारलेली नाही. कारण नुसते करार करून काही होत नाही. अंमलबजावणीच्या पातळीवरसुद्धा झटावे लागते. या अहवालानुसार जगातले ४३ देश असे आहेत ज्यांची सर्व मानकांमधील कामगिरी इतकी असमाधानकारक की २०५० पर्यंत हे त्या देशांतील पर्यावरणीय चित्र बदलण्याची शक्यता नाही. यातही भारत आहे. ज्या देशांची धोरणे पारदर्शी आणि उद्योगस्नेही अशांची प्रगती योग्य दिशेने असल्याचे सांगतानाच हा अहवाल दरडोई उत्पन्न व पर्यावरणीय मानकांचा सहसंबंध कोणत्या देशात उत्कृष्ट हेही कथन करतो. पॅरिस करारातून बाहेर पडणाऱ्या अमेरिकेचा अपवाद वगळला तर जगभरातील अनेक श्रीमंत देशांनी या मुद्दयावर चांगली कामगिरी बजावली, असे दाखवून देतानाच हा अहवाल इतर देशांविषयी तीव्र चिंता व्यक्त करतो. जगातल्या ५० टक्के देशांत रोज निर्माण होणाऱ्या कचऱ्याचे व्यवस्थापन नीट केले जात नाही. त्याच्या विल्हेवाटीसाठी अनेक देशांनी नवनवे तंत्रज्ञान विकसित केले असले तरी या देशांनी ते स्वीकारण्यात फारशी उत्सुकता दाखवली नाही. त्यामुळे स्वच्छतेच्या मानकामध्ये हे देश खूपच मागे आहेत असे हा अहवाल सोदाहरण दाखवून देतो.

आता प्रश्न उरतो तो गचाळ कामगिरी बजावणाऱ्या भारताचे काय? पर्यावरण रक्षणाच्या मुद्दय़ावर केवळ हाकारे देण्यातच हा देश आजवर धन्यता मानत आलेला असे खेदाने का होईना पण नमूद करावे लागते. साधा ऊर्जेचा मुद्दा घ्या. अजूनही आपण पारंपरिक निर्मितीतच रमलो आहोत. एवढा महाकाय देश जादूची कांडी फिरवल्याप्रमाणे अपारंपरिक ऊर्जेकडे वळणे शक्य नाही. हे काम टप्प्याटप्प्यानेच होणे गरजेचे हे मान्य केले तरी यातली आपली प्रगती मुंगीच्या गतीचीच.

## थोडक्यात

# तुळसाबाई कावल विद्यालयाच्या यशाची परंपरा यावर्षीही कायम

**किरण कुमार निमकंडे**



**पातुर :** महाराष्ट्र राज्य उच्च माध्यमिक परीक्षा मंडळाचा निकाल नुकताच जाहीर करण्यात आला. यात स्थानिक तुळसाबाई कावल उच्च माध्यमिक विद्यालयाच्या सर्वच शाखांचा निकाल हा यशाची परंपरा कायम राखणारा लागला आहे. तुळसाबाई कावल उच्च माध्यमिक विद्यालयाचा एकूण निकाल ९४.९२ टक्के लागला असून यामध्ये विज्ञान शाखा व वाणिज्य शाखांचा निकाल १०० टक्के तर कला शाखेचा निकाल ८३. ७५ टक्के लागला आहे .विज्ञान शाखेतून कु वैष्णवी बाळाभाऊ दांदळे ९० . ३३ टक्के गुण घेऊन प्रथम तर अद्वैत गणेश देशमुख ९०. १७ टक्के गुण घेऊन द्वितीय तर पियुष संतोषसिंह चांदेकर ८८. १६ टक्के गुण घेऊन तृतीय आला आहे. वाणिज्य शाखेतून कु श्रेया घनश्याम मोकळकर ७९.३ ज्ञ् गुण घेऊन प्रथम कु जोत्स्ना गणेश कोरडे ७३ . ५ टक्के गुण घेऊन द्वितीय तर कु साक्षी सुरेश गावंडे ७३ . ३३ टक्के गुण घेऊन तृतीय आली आहे. कला शाखेत कु भक्ती हरीश मेतकर ७८.५ टक्के गुण घेऊन प्रथम , ज्ञानेश्वर अत्रिनंदन आवटे ७७.५ टक्के गुण घेऊन द्वितीय तर कु. प्रतीक्षा भीमराव इंगळे ७३ टक्के गुण घेऊन तृतीय आली आहे. तालुक्यात फार मोजक्या ठिकाणी शिकविल्या जाणाया एचएससी व्होकेशनल अभ्यासक्रमा मध्ये सुद्धा तुळसाबाई कावल विद्यालयाच्या एच एस सी व्होकेशनल शाखेचा एकूण निकाल ८९. २८ टक्के लागला आहे .यामध्ये फुड प्रोडक्शन टेक्नॉलॉजी या विषयातून कु. पल्लवी संजय गुंजकर ७०.५ टक्के गुण घेऊन प्रथम आली आहे . हॉर्टिकल्चर शाखेतून कुमारी साक्षी बोचरे ७५.५ टक्के गुण घेऊन प्रथम तर इलेक्ट्रिकल मेन्टेनन्स शाखेतून रोहन राऊत ६९ टक्के गुण घेऊन प्रथम आला आहे. विद्यार्थ्यांनी मिळवलेल्या या घवघवीत यशाबद्दल बेरार एज्युकेशन सोसायटीचे व्यवस्थापक तथा माजी प्राचार्य विजयसिंहजी गहीलोत सर , सचिव स्नेहप्रभादेवी गहीलोत मॅडम , प्राचार्य अंशुमनसिंह गहिलोत सर बेरार एज्युकेशन सोसायटी संचालक अजितसिंह गहिलोत सर , जगमोहन सर , अशोकसिंह गहिलोत सर, उपप्राचार्य एस बी चव्हाण सर , उपमुख्याध्यापक वाशिमकर मॅडम , पर्यवेक्षक परमाळे मॅडम , तसेच सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी विद्यार्थी व त्यांच्या पालकांचे अभिनंदन केले आहे.

# पातूर येथे श्रींच्या पालखीचे जल्लोषात स्वागत



**अविनाश पोहरे**

**पातूर :** श्रीक्षेत्र शेगाव येथून पंढरपूरकडे आषाढी एकादशीसाठी निघालेली श्री गजानन महाराज यांच्या पालखीचे शनिवारी सायंकाळी आगमण झाले.भाविकांनी माऊलीच्या पालखीचे शहरात ठिकठिकाणी जल्लोषात स्वागत केले.शेगाव येथून निघालेल्या पायदळ दिंडीचा पातूर येथे मुक्काम होता. ठिकठिकाणी दर्शनासाठी हजारो भाविकांनी गर्दी केली होती. चौकाचौकात श्री.संत गजानन महाराज यांची मूर्ती ठेवून भाविकांनी पाखलीत सहभागी वारकऱ्यांसाठी विविध साहित्याचे वाटप केले.जागोजागी फुलांच्या माळा, रांगोळया, फटाक्याची आतिषबाजी, स्वागत कमानी, फलकांनी संपूर्ण चौक सुशोभित करण्यात आले होते. उत्साहपूर्ण वातावरणात वारकरी व भाविकांनी श्रींच्या पालखीचे स्वागत केले. दुपारी ४ वाजता वंदनाताई ग्रामीण आयुर्वेदिक महाविद्यालयाच्या मैदानावर पालखी सोहळा विसावा घेऊन मेन रोड मार्गे प्रस्थान केले. संभाजी चौक, मिलिंद नगर,जुने बसस्थानक पातूर पोलीस स्टेशन परिसर ते पातूर पंचायत समिती येथे भाविकांना पालखीचे दर्शनासाठी व्यवस्था करण्यात आली होती. वारकऱ्यांना साहित्याचे वाटप करण्यात आले. कोरोना साथीमुळे दोन वर्षाच्या निर्बंधामुळे पालखी सोहळयाला मर्यादा होती. यावर्षी कोणत्याही निर्बंधाशिवाय श्री गजानन महाराज पालखीचे पातूर नानासाहेब नगरीत आगमन झाले. वारकरी व भाविकांमध्ये उत्साह संचारला होता. ही पायदळ वारी भजनी दिंडी, अश्वासह सुमारे ७०० वारकरी ध्वज घेवून सहभागी झाले आहेत.यावेळी पातुर पोलीस स्टेशन चे कर्तवदक्ष ठाणेदार मा. हरिष गवळी व उपनिरीक्षक मा. हर्षल रत्नपारखी,वनपरीक्षेत्र अधिकारी धिरज मदने तसेच पोलीस कर्मचारी यांनी श्रींच्या पालखीचे विशेष पूजा-अर्चना करून श्रींचे दर्शन घेतले.पालखी प्रमुख वारकरी यांच्या तर्फे सत्कार करण्यात आला.यावेळी महाराष्ट्र पोलीस बॉईज असोसिएशन विद्यार्थी व युवक आघाडी यांनी सहकार्याचे योगदान देऊन पालखीचे स्वागत करण्यात आले.

# तुफान डान्स अकादमी तर्फे उन्हाळी प्रशिक्षण शिबीर

**महेश निमसटकर**



**भद्रावती :** येथील तुफान डान्स अकादमी तर्फे आयोजित उन्हाळी प्रशिक्षण शिबीराचा नुकताच समारोप करण्यात आला.अकादमीचे कोरिओग्राफर आश्विन खोब्रागडे व डायरेक्टर विजय श्रीवास यांच्या नेतृत्वात दि.२१ मे ते ११ जूनपर्यंत उन्हाळी प्रशिक्षण शिबीर येथील फेअरी लँड स्कुलच्या आवारात यशस्वी रित्या पार पडले. यात फेयरीलँड स्कुलच्या संचालक वर्षा धानोरकर व युवराज धानोरकर यांचा मोठा सहयोग होता. शिबिरामध्ये ५० पेक्षा जास्त विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. त्यात विद्यार्थ्यांना नृत्य, संगीत, कराटे, आर्ट ॲन्ड क्राफ्ट, स्केटिंग, योग शिक्षण, शिष्टाचार व विविध प्रकारचे प्रशिक्षण या शिबिरात विद्यार्थ्यांना देण्यात आले. यात शिक्षक म्हणून आश्विन खोब्रागडे ( नृत्य ), नैतिक बिंजवे ( गेम्स ) , पवन राजभर ( कराटे ), मृणाल बोरसरे ( आर्ट एंड क्राफ्ट ) , प्रकाश आस्वले, सुनील वैद्य, रविन्द्र भोयर ( योग व शिष्टाचार ), राजेश येरणे ( स्केटिंग ), दानिश शेख ( संगीत ), समीक्षा अडोले ( नृत्य ) व इतर पालकांनी आपले सहयोग दिले.

# वसंतराव नाईक विज्ञान कनिष्ठ महाविद्यालयाची शंभर टक्के निकालाची परंपरा कायम

**अविनाश पोहरे**



**पातूर :** ८ जून २०२२ रोजी महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाचा निकाल नुकताच ऑनलाइन जाहीर झाला असून यामध्ये पातूर येथील वसंतराव नाईक विद्यालय व विज्ञान कनिष्ठ महाविद्यालयाने आपली यशाची परंपरा कायम राखत यावर्षी सुद्धा १०० ज्ञ् निकालाची परंपरा कायम ठेवली आहे.या कनिष्ठ महाविद्यालयातून विज्ञान शाखेत करीता यावर्षी एकूण ८४ विद्यार्थी परीक्षेसाठी प्रविष्ट झाले होते,त्यापैकी ५९ विद्यार्थी हे प्राविण्य श्रेणी सह उत्तीर्ण झाले आहेत तर २५ विद्यार्थी हे प्रथम श्रेणीमध्ये उत्तीर्ण झाले आहेत.कनिष्ठ महाविद्यालयातील विज्ञान शाखेमधून संकेत कल्याणकर या विद्यार्थ्याने ८५ .०० % गुण प्राप्त करून तो कनिष्ठ महाविद्यालयातून प्रथम क्रमांकाचा मानकरी ठरला, तसेच कु.शुभांगी बंड हिने ८४ . ८३ज्ञ् गुण प्राप्त करून द्वितीय क्रमांक पटकावला, तर अथर्व राऊत याने ८४. ६७ % गुण प्राप्त करून तृतिय क्रमांक प्राप्त केला, तसेच कु. किरण राठोड ८४. १७ %, कु. कोमल गुडधे ८३ . ६७ %, सिद्धांत उगले ८३. ५० ,कु. भारती तायडे ८३.१७% ,कु. समीक्षा इंगळे ८३.१७ %, वेदांत अत्तरकार ८३.१७ कु. पुनम बंड ८३.०० %, कु.पूनम साबळे ८२.५० % पवन तारापुरे ८२.१७ ज्ञ् गुण प्राप्त केले, आदी विद्यार्थ्यांसह महाविद्यालयातील सर्व विद्यार्थी उत्कृष्ट गुणांसह उत्तीर्ण झाले आहेत. सामाजिक, शैक्षणिक व सांस्कृतिक दृष्ट्या अग्रेसर असलेल्या या कनिष्ठ महाविद्यालयाच्या निकालाची परंपरा उत्कृष्ट अध्यापन व अतिरिक्त शिकवणी वर्ग यामुळे शक्य होत आहे. संस्थेचे संस्थापक सचिव रामसिंग जाधव साहेब यांनी महाविद्यालयातील सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे कौतुक केले व भावी जीवनासाठी शुभेच्छा दिल्या. कनिष्ठ महाविद्यालयातील सर्व विद्यार्थ्यांनी आपल्या यशाचे श्रेय महाविद्यालयाचे प्राचार्य एस.एम. सौंदळे तसेच पी.जे राठोड, ए.व्ही.सोनटक्के, प्रा.जे.डी. भारस्कर, प्रा.व्ही.आर. थोरात, प्रा आर एम.बचाटे, प्रा.एस.टी.गाडगे, प्रा एस. बी.आठवले, जी.एन. राऊत, सी .ए. वाघ, सौ.आर.ए. जाधव, सौ.आर. एस.देशमुख, सौ.के.डी.लोखंडे, एस.एच.जाधव आदी शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना दिले.

# लोकमान्य कनिष्ठ महाविद्यालयाचा विज्ञान शाखेचा १०० टक्के

**महेश निमसटकर**



**भद्रावती :** उत्कृष्ट निकालाची परंपरा असलेल्या तसेच आपल्या शिस्त प्रियतेची ख्याती असलेल्या लोकमान्य विद्यालय तथा कनिष्ठ महाविद्यालय भद्रावतीचा बारावीचा विज्ञान शाखेचा निकाल १०० टक्के लागला असून कला शाखेचा निकाल ९६. ६३ टक्के इतका लागला आहे.दरवर्षी प्रमाणे आपल्या उत्कृष्ट निकालाचे सातत्य याहीवर्षी या महाविद्यालयाने राखले आहे.विज्ञान शाखेचा विद्यासागर नितीन दादीलवार हा विद्यार्थी ८८ टक्के गुण मिळवून महाविद्यालयातून प्रथम आला. श्रद्धा धनंजय गुंडावार ८३. ३३ टक्के गुण मिळवून द्वितीय क्रमांकावर आली. तर साहिल शामराव दुरूटकर ८० टक्के गुण घेऊन तृतीय क्रमांकावर उत्तीर्ण झाला. कला शाखेतून रमेश संजय काकडे हा ७२. ६६ गुण घेऊन प्रथम, प्रतिक्षा बालाजी नन्नावरे ७२ टक्के गुण घेऊन द्वितीय, तर प्रणय योगेश ढोके ६६. १६ टक्के गुण घेऊन तृतीय आला.या सर्व गुणवंत विद्यार्थ्यांचा महाविद्यालयाचे संचालन करणाऱ्या लोकसेवा मंडळ भद्रावती तर्फे सत्कार करण्यात आला. याप्रसंगी लोकसेवा मंडळाचे अध्यक्ष चंद्रकांत गुंडावार, शाळा समिती अध्यक्ष उल्हास भास्करवार, मंडळाचे सदस्य तथा माजी प्राचार्य गोपाल ठेंगणे, माजी प्राचार्य अविनाश पामपट्टीवर, सदस्य उमाकांत गुंडावार, संजय पारधे, प्राचार्या आशालता सोनटक्के, उपप्राचार्य सचिन सरपटवार, पर्यवेक्षक रूपचंद धारणे. प्रा. नितीन लांजेवार, प्रा. गौरकर, प्रा. हुमणे, प्रा .स्वाती गुंडावार,प्रा. शेंडे, प्रा. रोडे, प्रा. मुंजे तसेच कर्मचारी वर्ग उपस्थित होते.

# ग्रामीण भागात पारंपारीक खेळांचा लोप

## डॉ. अंकुश आगलावे यांनी व्यक्त केली खंत

**महेश निमसटकर**



**भद्रावती :** ग्रामीण भागात लहान व युवा वर्गाच्या हातात संगणक व मोबाईल फिरत असल्याचे चित्र दिसून येत असून त्यामुळे ग्रामीण भागात पारंपारिक खेळ लोप पावत असल्याची खंत डॉ. अंकुश आगलावे यांनी व्यक्त केली.ते वरोरा येथे विवेकानंद ज्ञानपीठ कॉन्व्हेंट व तालुका क्रीडा संकुल यांच्या वतीने आयोजित खो-खो सामन्याच्या उद्घाटन सोहळया प्रसंगी बोलत होते.डॉ. आगलावे पुढे म्हणाले की, विविधतेने नटलेल्या भारतीय संस्कृतीत कला, क्रीडा, धार्मिक-अध्यात्मिकतेसोबत ग्रामीण खेळांनाही मोठे महत्व दिले जाते. मात्र दिवसेंदिवस खेळ बदलत जात असून लोप पावत असल्याचे दिसून येत आहे. तसेच देशाचे भविष्य हे विद्यार्थ्यांच्या हातात असून खेळाच्या माध्यमातून भविष्य घडविता येते. देश भारतीय घटनेमुळे, तर गावांचा कारभार ग्रामगीता व्दारे चालतो. तसेच संतांनी समाज जनजागृती करून समाज व्यसनमुक्त करण्याचा प्रयत्न केला. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी शिका, संगठीत व्हा व संघर्ष करा असे सांगितले. त्यामुळे समाजातील गरीब घटकांतील वर्गानी आपले अस्तित्व निर्माण करून प्रत्येक क्षेत्रात आपला पाय खंबीरपणे रोवला पाहिजे असेही ते याप्रसंगी म्हणाले. यावेळी कार्यक्रमाला आ. प्रतिभाताई धानोरकर उद्घाटक म्हणून उपस्थित होत्या. तर कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून माजी विधानसभा उपाध्यक्ष ॲड. मोरेश्वर टेमुर्डे उपस्थित होते.तर प्रमुख अतिथी म्हणून माजी नगराध्यक्ष अहेतेशाम अली, जिल्हा शिवसेना प्रमुख मुकेश जीवतोडे, माजी सभापती राजू चिकटे, माजी न.प.उपाध्यक्ष अनिल झोटिंग, सी.डी.सी.सी.बँकेचे संचालक रवींद्र शिंदे, शेगांव (बु.) ग्राम पंचायतीचे सरपंच सिद्धार्थ पाटील, तहसीलदार रोशन मकवाने, ठाणेदार दीपक खोब्रागडे, तालुका क्रीडा अधिकारी विजय ढोबाळे, खो-खो फेडरेशन चंद्रपूरचे सचिव मोरे, विदर्भ खो-खो फेडरेशन सचिव सुधीर निंबाळकर, आनंदवन येथील क्रीडा शिक्षक तानाजी वायस्कर, सागर कोहळे ,रवी चरूरकर, धनराज रेवतकर उपस्थित होते.

# कोरोना काळात बंद केलेला रेल्वे थांबा पूर्ववत सुरू करा ; अमित गुंडावार यांची मागणी

**महेश निमसटकर**



**भद्रावती :** कोरोना काळात बंद करण्यात आलेला भांदक रेल्वे स्थानकावरील रेल्वे थांबा पूर्ववत सुरू करण्यात यावा, अशी मागणी भाजयुमोचे प्रदेश उपाध्यक्ष अमित गुंडावार यांनी एका निवेदनाद्वारे माजी केंद्रीय गृह राज्यमंत्री हंसराज अहीर यांच्याकडे नुकतीच केली आहे.निवेदनात म्हटले आहे की, भांदक रेल्वे स्थानक येथे इंग्मोर एक्सप्रेस , दक्षिण एक्सप्रेस , तेलंगना एक्सप्रेस , जयंती एक्सप्रेस , दादर लिंक एक्सप्रेस , पटना एक्सप्रेस इत्यादी गाडयांचा थांबा कोरोना पूर्व काळात दिलेला होता. कोविड १९ महामारी मुळे देशात लॉकडाऊन लागल्याने रेल्वे पुर्णतः बंद झाली होती. परंतु हळूहळू रेल्वे पुर्ववत सुरू करण्यात आली आणि इतर गावातील थांबे सुध्दा पुर्ववत सुरू करण्यात आले. परंतु भांदक रेल्वे स्टेशनला असलेला थांबा सुरू करण्यात आलेला नाही. पूर्वी अस्तित्वात असलेल्या सर्व रेल्वे गाड्यांचे थांबे भांदक रेल्वे स्थानकास पूर्ववत सुरू करणे गरजेचे आहे. कारण भांदक हे औद्योगीक वसाहतीचे क्षेत्र आहे. येथे आयुध निर्माणी चांदा , वेस्टर्न कोल फिल्ड , भांदक सिरॅमिक , एन.टी.पी.सी. एम्टा कोल माईन्स लिमि. इत्यादी मोठ्या औद्योगीक क्षेत्राची वसाहत असुन भद्रावती हे तिर्थ क्षेत्र सुध्दा आहे. हिंदू, बौध्द व जैन धर्मीयांचे तिर्थक्षेत्र भांदक येथे आहे. विश्वप्रसिध्द बौध्दलेणी सुध्दा भांदक येथेच आहे. त्यामुळे पर्यटक भांदक येथे भरपुर प्रमाणात रेल्वेनी ये-जा करतात. औद्योगीक शहर असल्याने देशातील प्रत्येक राज्यातील लोकांचे आवागमन भांदक रेल्वे स्थानकावरून होत असते. भांदक शहरापासुन २० कि.मी. अंतरावर वरोरा शहर असून त्या ठिकाणी नविन गाड्यांचे थांबे देण्यात आलेले आहे. परंतु सदर सर्व गाडयांचे थांबे भद्रावती औद्योगीक शहर असल्याने भदावती येथे थांबा देणे गरजेचे होते. पण तसे न होता सुरू असलेल्या गाड्यांचे सुध्दा थांबे बंद करण्यात आले. त्यामुळे येथील जनजीवन विस्कळीत झाले आहे.कोरोना काळात बंद झालेल्या गाड्यांचा थांबा पूर्ववत सुरू झाल्यास कित्येकांना रेल्वेचा लाभ घेता येईल , शैक्षणिक व नौकरी निमित्ताने रेल्वेने जाणे- येणे करणाऱ्यांना सुध्दा नाहक त्रास सहन करावा लागत आहे. रेल्वे स्टेशनवर आधारीत व्यापार सुध्दा पूर्णतः ठप्प झालेला असून रेल्वे स्थानक परिसरातील व्यापा-यांवर सुध्दा उपासमारीची वेळ आलेली आहे. त्यामुळे लोकहितार्थ कोरोना पूर्व काळात सुरू असलेल्या प्रत्येक गाडीचा थांबा पुर्ववत सुरू करून आम जनतेस दिलासा द्यावा तसेच नवजीवन एक्सप्रेस, हिसार एक्सप्रेस, ग्रॅण्ड ट्रक एक्सप्रेस चा सुध्दा थांबा भांदक रेल्वे स्थानकास देण्यात यावा अशीही मागणी निवेदनात करण्यात आली आहे.निवेदन सादर करताना अमित गुंडावार, श्रीपाद बाकरे, प्रकाश मेंढे, श्रीनिवास घोसे, बबलू पठाण, वैभव टाले उपस्थित होते.

# सावित्रीबाई फुले विद्यालयाची उत्कृष्ट यशाची परंपरा कायम

**किरण कुमार निमकंडे**



**पातूर :** महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षेचे चा निकाल आज दिनांक आठ जूनला दुपारी एक वाजता ऑनलाईन पद्धतीने जाहीर झाला असून दरवर्षी प्रमाणे याहीवर्षी सावित्रीबाई फुले कनिष्ठ महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी उत्कृष्ट यशाची परंपरा कायम राखत शंभर टक्के निकाल लावला आहे. विद्यालयातील एकूण ४८ विद्यार्थ्यांपैकी ४८ विद्यार्थी उत्तीर्ण झाले असून त्यामध्ये विशेष प्रावीण्यासह २६ विद्यार्थ्यांनी यश संपादन केले आहे तर प्रथम श्रेणी मध्ये २२ विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत. यामध्ये शाळेची विद्यार्थिनी कुमारी संजना सांगळे हिने ८७. ३३ % मिळवून प्रथम क्रमांक प्राप्त केला असून अश्विनी जाधव हिने ८२% मिळून द्वितीय क्रमांक मिळवला आहे तर प्रेरणा इंगळे हिने ८१. ६७ % गुण मिळवून क्रमांकाची मानकरी ठरली आहे. यासह विद्यालयातील सर्व विद्यार्थी उत्कृष्ट गुणांसह उत्तीर्ण झाले आहेत. शैक्षणिक दृष्ट्या पंचक्रोशीत नाव कमावलेल्या सावित्रीबाई फुले कनिष्ठ महाविद्यालयाने उत्कृष्ट नियोजन व अनुभवी शिक्षक वर्ग, डिजिटल शिक्षण प्रणाली द्वारे विद्यार्थ्यांना शिक्षण देऊन दरवर्षीच विद्यालयाचे विद्यार्थी उत्कृष्ट श्रेणी मिळवतात. यासाठी संस्थेचे सचिव सचिन ढोणे हे अध्ययन आणि अध्यापन प्रक्रिया सुकर होण्यासाठी नवीन नवीन तंत्रज्ञानाचा वापर करतात हे याठिकाणी उल्लेखनीय. प्रथम द्वितीय व तृतीय क्रमांक मिळविलेल्या विद्यार्थ्यांचे व पालकांचे कौतुक व शुभेच्छा देण्यासाठी कनिष्ठ महाविद्यालयाचे प्राचार्य जे.डी कंकाळ, शिक्षक पंजाब ननीर,दिनेश करोडदे, उद्धव काळपांडे,देविदास राठोड, लिपिक मनोज राखोंडे आदीसह शाळेतील कर्मचाऱ्यांनी विद्यार्थ्यांच्या घरी जाऊन विद्यार्थ्यांना व पालकांना पुष्पगुच्छ देऊन पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या यावेळी विद्यार्थ्यांनी आपल्या यशाचे श्रेय विद्यालयाची नियोजनबद्ध शिक्षण पद्धती आपले आई वडील शिक्षक वृंद यांना देतात.

# सामाजिक कार्यकर्ते रविंद्र शिंदे यांचा कोरोना योद्धा म्हणून सत्कार

**महेश निमसटकर**



**भद्रावती :** चंद्रपूर येथे सेल्फ रिस्पेक्ट मुव्हीमेंट तर्फे नुकताच शिवराज्याभिषेक दिन महोत्सव साजरा करण्यात आला. याप्रसंगी विविध क्षेत्रात उल्लेखनीय योगदान देणाऱ्या बावीस व्यक्तीचा सत्कार करण्यात आला. यावेळी स्व. श्रीनिवासराव मेमोरियल रविंद्र शिंदे चॅरिटेबल ट्रस्टचे संस्थापक अध्यक्ष व जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे माजी अध्यक्ष तथा विद्यमान संचालक सामाजिक कार्यकर्ते रविंद्र शिंदे यांनी दिलेल्या कोरोना संक्रमण कालावधीतील उल्लेखनीय योगदानाबद्दल कोरोना योद्धा म्हणून त्यांचा मान्यवरांच्या शुभहस्ते सत्कार करण्यात आला.सामाजिक कार्यकर्ते रविंद्र शिंदे यांनी कोरोना संक्रमण कालावधीत स्वतःच्या मालकीच्या मंगल कार्यालयात कोविड प्रतिबंधात्मक उपचार केंद्र सुरु केले. या केंद्रावर चंद्रपूरसह यवतमाळ व गडचिरोली जिल्ह्यातील सुमारे दिड हजार रुग्णांनी इलाज घेतला. त्या सर्वांचा भोजन, निवास व औषधोपचाराचा खर्च स्वतः रविंद्र शिंदे यांनी केला. त्याचप्रमाणे भद्रावती व वरोरा तालुक्यातील ग्रामीण व शहरी क्षेत्रात ठिकठिकाणी सॅनीटाईझर व माक्सचे वितरण केले. गोरगरीब व गरजवंतांना एक हात मदतीचा या उपक्रमातून अन्नधान्य किट व अत्यावश्यक वस्तुंचे वितरण केले. कोरोना संक्रमण कालावधीतील सेवाभावी कार्य करतांना रविंद्र शिंदे यांनी शासनाकडून एकही पैश्याचा निधी घेतला नाही.शिवराज्याभिषेक दिना निमित्य आयोजित कार्यक्रमात व्यासपिठावर अध्यक्षस्थानी बळीराज धोटे, प्रमुख वक्ते प्रा. डॉ. अशोक राणा ,ॲड.दत्ता हजारें, ॲड.फरहाद बेग, इंजि .अशोक मस्के, सुधाकर अडबाले, हिराचंद बोरकुटे, अनवरभाई अली, भास्कर मुन, बंडू हजारें, सुभाष शिंदे, राजकुमार जवादे, इंजि. एल .व्ही .घागी , ए. एल. वनकर , प्रा. माधव गुरनुले, पांडुरंग गावतुरे आणि गडकर उपस्थित होते.

# प्रतिकूल परिस्थितीवर मात करून कु.आचलने मिळवले विशेष प्राविण्य

**अविनाश पोहरे**



**पातूर :** महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षेचे चा निकाल नुकताच जाहीर झाला असून पातुर येथील सावित्रीबाई फुले शिक्षण प्रसारक मंडळ द्वारा संचालित सावित्रीबाई फुले कनिष्ठ महाविद्यालय पातूरची विद्यार्थिनी कु.आचल सुमेध गवई हिने अत्यंत प्रतिकूल परिस्थितीवर मात करून विद्यालयातून तृतीय क्रमांक मिळवला आहे.आचल ही अत्यंत गरीब मोल मजुरी करणाऱ्या कुटुंबातील असून आई वडिलांचे स्वप्न उराशी बाळगून व आपल्या भविष्याचा वेध घेत तिने रात्रंदिवस अभ्यास करून बारावीच्या विज्ञान शाखेतून परीक्षा दिली व विद्यालयातून तृतीय क्रमांक मिळाला. कोरोना काळात शाळा महाविद्यालय बंद असल्या मुळे योग्य वेळेस स्वयंअध्ययन यावर भर देऊन तिने यश संपादन केले. तिच्या यशाचे श्रेय आई-वडील, शिक्षक यांना देते.

# राज्यव्यापी राष्ट्रीय शिक्षण धोरणावर कार्य शाळेचे आयोजन

**विकास ठाकरे**

**अकोला :** शिक्षण नीती आंदोलन समन्वय समिती. अकोला च्या वतीने रविवार दिनांक १२ जुन २०२२ ला सकाळी ११ वाजता राज्यव्यापी राष्ट्रीय शिक्षण धोरण २०२० या विषयावर जनतेशी संवाद कार्यशाळेचे आयोजन उस्माना आझाद उर्दू हायस्कूल व के .एम . आसगर हुसण शिक्षण महाविद्यालय रतनलाल प्लॉट अकोला येथे आयोजित केली असून या कार्यशाळेला शिक्षण क्षेत्रातील तज्ञ, शिक्षक मुख्याध्यापक, संस्थाध्यक्ष तसेच शैक्षणिक क्षेत्रात काम करणारे सामाजिक कार्यकर्ते यांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन समाजसेवक गजानन हरणे यांनी केले आहे. या कार्यशाळेचे उदघाटन शिक्षक आमदार माननीय किरण सरनाईक यांच्या शुभहस्ते होणार आहे. कार्यक्रमाचे अध्यक्ष माननीय श्याम मुंडे अध्यक्ष सत्यशोधक शिक्षण सभा महाराष्ट्र, स्वागताअध्यक्ष माजी मंत्री खान मोहम्मद अजहर हुसेन , प्रमुख उपस्थिती विजय कौशाल, प्रशांत गावंडे, संयोजक सुरज मेश्राम आदी मान्यवर उपस्थित राहणार आहेत तरी नवीन शैक्षणिक धोरणाविषयी माहिती जाणून घेण्याकरिता जागृक नागरिक, महिला युवक-युवतींनी या कार्यशाळेला जास्तीत जास्त संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन गजानन हरणे समाजसेवक तथा संयोजक निभय बनो जनांदोलन यांनी प्रसिद्धीपत्रकाद्वारे केली आहे

## थोडक्यात

### पत्रकार प्रशांत नेटके यांनी वृक्षारोपण करून केला वाढदिवस साजरा

सोनेराव गायकवाड



**लातूर :** झाडे आपल्याला ऑक्सिजन, सावली, फळे,फुले देतात.त्यामुळे वृक्षारोपण आणि वृक्ष संवर्धन ही काळाची गरज आहे.संत तुकाराम महाराजांच्या वृक्षवल्ली आम्हा सोयरे वनचरे पक्षीही सुस्वरे आळविती या अभंगाचा दाखला देत औसा तालुक्यातील तपसेचिंचोली येथील पत्रकार प्रशांत नेटके यांनी त्यांचा वाढदिवस वृक्षारोपण करून साजरा केला.

ऑक्सिजनची गरज व झाडांचे महत्व लक्षात घेऊन व सामाजिक बांधिलकी जपत पत्रकार प्रशांत नेटके यांच्या वतीने तपसे चिंचोली येथील खंडोबा मंदिर परिसरात वृक्षारोपण करण्यात आले.यावेळी माजी सरपंच मारुती नेटके ,चंद्रकांत गुरव ,खंडू नेटके,सतीश पाटील,किसन बनसोडे, प्रमोद नेटके,रितेश सरवदे,व्यंकट सुरवसे, गणेश नेटके ,महादू कांबळे,हणमंत नेटके ,मारुती शिंदे ,दिलीप नेटके यांच्यासह अनेक जण उपस्थित होते.

### डॉ. प्रकाश आमटेंना कर्करोगाचे निदान




साप्ता. अधिकारनामा

**पुणे :** सुप्रसिद्ध समाजसेवक डॉ. प्रकाश बाबा आमटे हेअरी सेल ल्युकेमियाने (ब्लड कॅन्सर) ग्रसित असल्याची धक्कादायक माहिती पुढे आलीय. डॉ. आमटे पुण्यातील दीनानाथ मंगेशकर रुग्णालयात उपचाररत असून गेल्या १० दिवसांपासून त्यांना न्युमोनियाची लागण झाली आहे. डॉ. प्रकाश आमटे डिसेंबर १९७३ पासून पत्नी डॉ. मंदाकिनी आमटे यांच्यासह गडचिरोली जिल्ह्यातील भामरागड तालुक्यातील हेमलकसा येथे लोकबिरादरी नावाने स्थानिक आदिवासी लोकांसाठी प्रकल्प चालवतात. तसेच लोकांनी आणून दिलेल्या जखमी वन्य प्राण्यांवरही ते उपचार करतात. डॉ. आमटेंना २००२ मध्ये भारत सरकारने पद्मश्री पुरस्काराने सन्मानित केलं आहे. तर २००८ मध्ये त्यांना पत्नी मंदाकिनी यांच्यासहन रेमन मॅगसेसे पुरस्काराने गौरवण्यात आले आहे. प्रकाशवाटा, रानमित्र यासारख्या पुस्तकांचे त्यांनी लेखन केले आहे. आमटेंना कर्करोगाचे निदान झाल्याचे वृत्त पसरल्यानंतर समाजात हुरहुर पसरली आहे. यापार्श्वभूमीवर त्यांचे सुपुत्र अनिकेत आमटे आणि कुटुंबातील इतर सदस्यांनी कुणीही फोन करून फार चौकशी करू नये असे आवाहन केले आहे. काही महिन्यांपूर्वी डॉ. प्रकाश आमटेंना कोरोनाचा प्रादुर्भाव झाला होता. त्यावेळी त्यांच्यावर नागपुरातील रुग्णालयात उपचार करण्यात आले होते. डॉ. प्रकाश आमटे यांच्या जीवन कार्यावर 'डॉ. प्रकाश आमटे : द रिअल हिरो'या नावाचा २०१४ मध्ये चित्रपट निघाला होता. या चित्रपटात ज्येष्ठ अभिनेते नाना पाटेकर यांनी प्रकाश आमटेंची भूमिका साकारली आहे. तर सोनाली कुलकर्णी, मोहन आगाशे, तेजश्री प्रधान आणि २०० आदिवासी कलावंतांच्या भूमिका आहेत.

### आडनावावरून जात ओळखणे चुकीचे – छगन भुजबळ

साप्ता. अधिकारनामा



**नाशिक :** केवळ आडनावावरून ओबीसींची खरी संख्या समजणार नाही, आडनावावरून जात ओळखता येणार नसल्याचे मत राज्याचे अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री छगन भुजबळ यांनी व्यक्त केले. राज्यात ओबीसींचे राजकीय आरक्षण पूर्ववत होण्यासाठी इम्पिरिकल डाटा जमा करण्याचे काम सुरू आहे मात्र काही ठिकाणी आडणावरून जात गृहीत धरली जात असल्याची गोष्ट समोर येत आहेत. अशी पद्धत चुकीचे असून यात सर्वपक्षीयांनी लक्ष घालण्याची गरज असल्याचे मत देखील राज्याचे मंत्री छगन भुजबळ यांनी व्यक्त केले. यावेळी बोलताना ते म्हणाले की राज्यात पवार, जाधव, गायकवाड, शेलार, होळकर अशी अनेक आडनावे आहेत की ही आडनावे वेगवेगळया जातीत आढळतात. समर्पित आयोगाची भूमिका ही ग्रामसेवक, तलाठी यांच्याकडून निवडणूक आयोगाच्या यादीतील प्रत्येक जातीतील लोकांची माहिती आयोगापर्यंत पोहचवावी मात्र यात काही चूका होत आहेत. एकच आडनाव एकाच जातीत असल्याचे गृहीत धरून माहिती पाठवली जात आहे त्यामुळे अश्या सदोष माहितीमुळे ओबीसींचा खरा टक्का समोर येणार नाही. सदोष महितीचा इम्पिरिकल डेटामुळे ओबीसींवर अन्याय होईल मात्र आम्ही हा अन्याय होऊ देणार नाही. ही गोष्ट आम्ही मुख्यमंत्र्यांच्या निदर्शनास आणून देऊन यात योग्य ती दक्षता घेण्याचे आवाहन राज्य मागासवर्गीय आयोगाला करणार आहोत.

राज्याचे विरोधीक्षनेते देवेंद्र फडणवीस यांनी देखील आज असाच प्रश्न उपस्थित केला आहे. मात्र विरोधीपक्षाने असे प्रश्न उपस्थित करण्याच्या ऐवजी बांठीया आयोगाला भेटून निवेदन दिले पाहिजे आणि राज्यातील सर्व ओबीसी संघटनांनी पुढे येऊन यात सत्य परिस्थिती बांठीया आयोगा समोर मांडल्या पाहिजे, स्थानिक पातळीवरून आयोगापर्यंत येत असलेल्या माहितीच्या प्रक्रियेत लक्ष घालून योग्य माहिती आयोगा पर्यंत कशी पोहचेल याची खबरदारी सगळयांनी घ्यावी असे आवाहन देखील मंत्री छगन भुजबळ यांनी केले. राज्यात इंपिरीकल डाटा जमा करण्याचे काम हे स्थानिक पातळीवर सुरू आहे. राज्याचे स्थानिक पातळीवरील महसूल यंत्रणेचा वापर करून इम्पिरिकल डाटा जमा केला जाऊ शकतो त्यामुळे तसे आदेश अधिका्यांना देणे गरजेचे आहे. गावातील तलाठी, ग्रामसेवक, सरपंच, पोलीस पाटील यांना त्या गावाची इत्यंभूत माहिती असते त्यामुळे त्यांची मदत घेऊन हे काम करणे आवश्यक आहे असे मत देखील त्यांनी यावेळी व्यक्त केले.

## शरद पवार राष्ट्रपती निवडणुकीचे उमेदवार; विरोधी पक्षाची सहमती? भाजपाला आव्हान

साप्ता. अधिकारनामा



**नवी दिल्ली :** देशात १८ जुलै रोजी राष्ट्रपती पदासाठी निवडणूक होणार आहे. तत्पूर्वी विरोधी पक्षांमध्ये बैठकीचा सिलसिला सुरू झाला आहे. राष्ट्रपतीपदासाठी विरोधी पक्षाकडून एकच उमेदवार असावा असा प्रयत्न होत आहे. विरोधी पक्षाच्या उमेदवारांमध्ये सर्वात आघाडीचं नाव राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष शरद पवार यांचे आहे. पुढील २ दिवसांत विरोधी पक्षाची दिल्लीत बैठक होणार आहे. त्यात शरद पवारांच्या नावाचा विचार झाल्यास विरोधी पक्षाकडून राष्ट्रपतीपदाच्या निवडणुकीसाठी शरद पवार रिंगणात उतरण्याची शक्यता आहे. गुरुवारी काँग्रेसचे ज्येष्ठ नेते मल्लिकार्जुन खरगे यांनी शरद पवार यांची मुंबईच्या सिल्व्हर ओक निवासस्थानी भेट घेतली. शरद पवारांच्या नावावर काँग्रेसही सहमत असल्याचे संकेत मिळत आहेत. त्यानंतर खरगे यांनी राज्याचे मुख्यमंत्री उद्धव ठाकरे आणि तामिळनाडूचे मुख्यमंत्री एमके स्टालिन यांच्याशी चर्चा केली. रविवारी आम आदमी पक्षाचे नेते संजय सिंह यांनीही शरद पवार यांच्याशी फोनवरून संवाद साधला आहे. शरद पवार यांचे विरोधी पक्षातील सर्वच नेत्यांचे चांगले संबंध आहेत. आघाडीचं सरकार बनवण्यात पवारांचा मोठा वाटा आहे.

महाराष्ट्रात भाजपाला सत्तेतून बाहेर काढण्यात आणि शिवसेनेला सोबत घेऊन महाविकास आघाडीची स्थापना करण्यात शरद पवारांचे मोठे योगदान आहे. पश्चिम बंगालच्या मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांनी ८ राज्याच्या मुख्यमंत्र्यांसह विरोधी पक्षातील २२ प्रमुख नेत्यांना पत्र पाठवत १५ जूनला दिल्लीत होणा्या संयुक्त बैठकीचं निमंत्रण दिले आहे. या बैठकीत राष्ट्रपती पदाच्या उमेदवारीबाबत चर्चा होऊ शकते. या बैठकीत शरद पवारांच्या नावावर एकमत होऊ शकते असं बोललं जात आहे. १८ जुलै रोजी देशात राष्ट्रपतीपदासाठी मतदान होणार आहे. त्यानंतर २१ जुलैला निकाल येईल. संविधान नियमानुसार, देशात विद्यमान राष्ट्रपतींचा कार्यकाळ संपण्याआधीच पुढील राष्ट्रपतीपदासाठी निवडणूक होणार आहे. भारताचे राष्ट्रपती रामनाथ कोविंद यांचा कार्यकाळ २४ जुलै रोजी संपणार आहे. आकडेवारीचं गणित लावलं तर भाजपा लोकसभा आणि राज्यसभेत मजबूत स्थितीत आहे. त्याशिवाय अनेक राज्यात भाजपाचं सरकार आहे. अशावेळी भाजपाविरोधात शरद पवारांसारख्या अनुभवी आणि मजबूत उमेदवार रिंगणात उतरवण्याची तयारी विरोधी पक्षाने केली आहे.

## टीम इंडिया करणार संघात बदल

साप्ता. अधिकारनामा




**वृत्तसंस्था :** दक्षिण आफ्रिकेकडून सलग दोन टी२० सामने गमावल्यानंतर आता टीम इंडियासमोर मालिका वाचवण्याचे आव्हान आहे. दक्षिण आफ्रिकेने दिल्ली आणि कटकमधील सामने सहज जिंकले, पण आता विशाखापट्टणममध्ये टीम इंडिया पुनरागमन करू शकेल का? या प्रश्नाचे उत्तर तिसऱ्या सामन्यानंतरच कळेल. मात्र, हा सामना जिंकण्यासाठी टीम इंडियाला अधिक परिश्रमासह संघात काही बदलांची गरज आहे. टीम इंडिया तिसऱ्या टी२० मध्ये प्लेइंग इलेव्हनमध्ये बदल करू शकते, असं सांगितलं जात असून दोन खेळाडूंचा पत्ता कट होणं जवळपास निश्चित आहे. टीम इंडिया फलंदाजी आणि गोलंदाजी या दोन्ही आघाड्यांवर आफ्रिकेपेक्षा कमकुवत दिसत आहे. दक्षिण आफ्रिका उत्कृष्ट क्रिकेट खेळत असून भारतीय संघाला पुनरागमन करण्यासाठी काहीतरी वेगळे करावे लागणार आहे. पण आता प्रश्न असा आहे की भारतीय संघाच्या प्लेइंग इलेव्हनमध्ये काय बदल होऊ शकतात, ते पाहूया.

टीम इंडियामध्ये दोन बदल निश्चित असल्याचे मानले जात आहेत. ऋतुराज गायकवाड दोन सामन्यांत फ्लॉप ठरला आहे. तसेच अक्षर पटेलची कामगिरीही फारशी चांगली झालेली नाही. हे दोन्ही खेळाडू आता संघाबाहेर होऊ शकतात. अक्षर पटेलच्या जागी टीम इंडिया व्यंकटेश अय्यरला संधी देऊ शकतो. कारण फलंदाजीसोबतच तो मध्यमगती गोलंदाजीही करू शकतो. याशिवाय, ऋतुराज गायकवाडला विश्रांती देऊन त्याजागी दीपक हुडाला संधी मिळू शकते. याशिवाय, गोलंदाजीतील धार वाढवण्यासाठी एखादा गोलंदाज कमी करून त्याजागी उमरान मलिकला संधी देण्याचा निणऱ्य चांगला ठरू शकेल. तिसरा टी२० सामना जिंकण्यासाठी टीम इंडियाला दमदार खेळ करावा लागणार आहे. यासोबतच आपली रणनितीही बदलावी लागू शकते. दक्षिण आफ्रिकेचा संघ फिरकीपटूं विरोधात चांगला खेळ करत असल्याने मध्यमगती गोलंदाजांचे आक्रमण आवश्यक असेल. त्याचबरोबर भारतीय फलंदाजांनाही आपली कामगिरी सुधारावी लागेल.

## गुलाबराव पाटलांनी उरकलं हॉस्पिटलचं भूमिपूजन; निमंत्रण पत्रिकेत आरोग्यमंत्र्यांचं नावच नाही

साप्ता. अधिकारनामा




**जळगाव :** जळगावातील प्रस्तावित माता व बालसंगोपन हॉस्पिटलचं भूमिपूजन वादाच्या भोवऱ्यात सापडले आहे. केंद्र आणि राज्य सरकारच्या निधीतून या रुग्णालयाचं काम होणार आहे. परंतु भूमिपूजनाच्या निमंत्रण पत्रिकेतून केंद्रीय आरोग्य राज्यमंत्री डॉ. भारती पवार आणि राज्याचे आरोग्य मंत्री डॉ. राजेश टोपे यांचीच नावे गायब झाल्यानं हा वाद निर्माण झाला आहे. हा वाद एवढ्यावर थांबला नसून भाजपचे खासदार उन्मेष पाटील यांनी याच विषयावरून पालकमंत्री गुलाबराव पाटील यांच्यावर गंभीर आरोप केलेत. पालकमंत्र्यांनी श्रेयवादासाठी आरोग्य यंत्रणेवर दबाव आणला, शासकीय प्रोटोकॉलचं पालन न करत घाईघाईने भूमिपूजन उरकलं असल्याचा दावाही त्यांनी केला आहे. दरम्यान, एकीकडे गुलाबराव पाटील यांनी रुग्णालयाच्या भूमिपूजनासाठी नारळ फोडला असला तरी दुसरीकडे मात्र वादालाही तोंड फुटलं. खासदार उन्मेष पाटलांनी संताप व्यक्त करत रुग्णालयासाठी कसा पाठपुरावा केला, त्याची माहिती देत सगळा इतिहासचं काढला. पालकमंत्र्यांचा टक्केवारीसाठी खटाटोप सुरू असल्याचा गंभीर आरोपही त्यांनी यावेळी केला.

याशिवाय भूमिपूजन सोहळ्याची निमंत्रण पत्रिका रात्रीतून बदलण्यात आल्याचाही आरोप उन्मेष पाटील यांनी केला. या प्रकरणी त्यांनी सरकारी अधिकाऱ्यांवर हक्कभंग प्रस्ताव आणण्याचा इशारा दिला आहे. "लोकांना घेऊन योजना राबवली पाहिजे. पालकमंत्री ठेकेदारांना घेऊन योजना राबवत आहेत, त्यामुळे हक्कभंग लावून अधिकाऱ्यांवर कारवाई करणार आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी यासाठी ३० कोटी रूपये नॅशनल हेल्थ मिशनमधून दिले आहेत. याचा आराखडा सात आठ वर्षांपूर्वी झाला होता. तेव्हा यांना जाग नव्हती. जेव्हा मी खासदार होतो तेव्हा जागा मिळवली. परत तो प्रस्ताव पाठवला. केंद्रीय आरोग्यमंत्र्यांनीही बैठका घेतला. हे सर्व पालकमंत्र्यांना माहित नाही. निविदा झाल्यावर माझं काय मी नारळ फोडतो, आम्ही स हेर्व लोकांसमोरही आणू," असं पाटील म्हणाले. आता पुढं नेमकं काय होतं हे पाहणं महत्त्वाचं असेल.

## संजय राऊतांमुळे 'मविआ'चं टेन्शन वाढलं; राष्ट्रवादीच्या बैठकीत नाराजीचा सूर

साप्ता. अधिकारनामा

**मुंबई :** राज्यसभा निकालानंतर महाविकास आघाडीला मोठा धक्का बसला. संख्याबळ नसताना भाजपाचा तिसरा उमेदवार काही मविआ समर्थक अपक्ष आणि घटक पक्षाच्या आमदारांच्या मतांवर निवडून आला. त्यामुळे कुणाची मते फुटली अशी चर्चा मविआ नेत्यांमध्ये सुरू आहे. राज्यसभा निवडणुकीत झालेल्या मतांच्या फुटीवरून शरद पवारही नाराज आहेत. राज्यसभेच्या पराभवाचा आढावा घेण्यासाठी राष्ट्रवादी नेत्यांची बैठक पार पडली. सकाळी साडे नऊ वाजता राष्ट्रवादी नेत्यांच्या बैठकीला सुरुवात झाली. संजय पवार यांचा पराभव कसा झाला? याचा आढावा घेण्यासाठी राष्ट्रवादीच्या नेत्यांची बैठक पार पडली. मात्र या बैठकीत शिवसेना खासदार संजय राऊत यांच्याविरुद्ध राष्ट्रवादी नेत्यांनी तीव्र नाराजी व्यक्त केली. राज्यसभेच्या निकालानंतर शिवसेना नेते संजय राऊत यांनी माध्यमातून अपक्ष आमदारांची नावे घेतली. त्यामुळे या आमदारांवर



अविश्वास असल्याचं प्रखरतेने समोर आले असं नेते म्हणाले.

तसेच आमदार देवेंद्र भुयार, संजयमामा शिंदे, श्यामसुंदर शिंदे या अपक्षांनी संजय राऊत यांच्या विधानावर नाराजी व्यक्त केली. काही दिवसांवर विधान परिषदेची निवडणूक येऊन ठेपली आहे अशावेळी राऊतांनी केलेले हे विधान कितपत योग्य आहे असा सवाल नेत्यांनी उपस्थित केला. या विधानामुळे मविआच्या इतर आमदारांवरही त्याचा परिणाम पाहायला मिळू शकतो आणि विधान परिषदेत त्याचा फटकाही बसू शकतो अशी भीती राष्ट्रवादी नेत्यांनी बैठकीत वर्तवली आहे. आमच्या मित्रपक्षांनी आमच्याशी दगाबाजी केली नाही. अपक्ष उमेदवारांनी आम्हाला शब्द देऊन मतदान केलं नाही. सहा सात मतं आम्हाला मिळाली नाहीत. आम्ही कोणत्या व्यवहारात पडलो नाही आणि कुठला व्यापार केला नाही. तरीही संजय पवार यांना पहिल्या पसंतीची ३३ मतं मिळाली. हा सुद्धा आमचा एक विजय आहे असं संजय राऊत म्हणाले. तसेच संजय पवार यांच्या पराभवानं मुख्यमंत्री उद्धव ठाकरे देखील व्यथित झाले आहेत. संजय पवार हे हाडाचे शिवसैनिक आहेत, असं संजय राऊत म्हणाले. काही ठिकाणी इतर काही व्यवहार आहे. ठीक आहे आज ते जिंकले असतील. पण आम्ही उद्या पाहू, बहुजन विकास आघाडीचे तीन आमदारांची तीन मतं आम्हाला मिळाली नाहीत. करमाळयाचे आमदार संजय मामा शिंदे, लोहयाचे आमदार शामसुंदर शिंदे, अपक्ष आमदार देवेंद्र भुयार यांनी शिवसेनेला मतं दिली नाहीत, ज्यांनी शब्द देऊन दगाबाजी केली, त्यांची यादी आमच्याकडे आहे, असा दावाही संजय राऊत यांनी केला होता.

## मध्यरात्री प्रेयसीच्या घरात घुसला जीआरपी पोलीस

साप्ता. अधिकारनामा



**उज्जैन :** नानाखेडा पोलीस स्टेशन हद्दीतील बसंत नगरमध्ये जीआरपी कॉन्स्टेबलसोबत मारहाणीची घटना समोर आली आहे. त्याच्या प्रेयसीच्या कुटुंबाने सळईने मारहाण केली. असे सांगितले जात आहे की, उज्जैन जीआरपी पोलिस स्टेशनमध्ये तैनात असलेला हवालदार रविवारी रात्री उशिरा त्याच्या प्रेयसीला भेटण्यासाठी तिच्या घरी पोहोचला तेव्हा प्रेयसीच्या वडिलांनी आणि भावाने त्याला मारहाण केली. पोलिसांनी गुन्हा दाखल करून आरोपींचा शोध सुरू केला आहे. मिळालेल्या माहितीनुसार, २६ वर्षीय जीआरपी कॉन्स्टेबल सुखपाल सिंग टेकम हा शहरातील नानाखेडा पोलीस स्टेशन हद्दीतील बसंत नगर येथील रहिवासी असून ते सध्या उज्जैन जीआरपीमध्ये तैनात आहेत. शनिवारी सुखपाल बसंत विहारमध्ये राहणाऱ्या आपल्या प्रेयसीला भेटण्यासाठी रात्री १२ वाजता उशिरा त्याच्या घरी पोहोचला. जिथे मुलीचे वडील आशुतोष आणि भाऊ मदन पोरवाल यांनी तिला बेदम मारहाण केली.जखमी सुखपालला जिल्हा रुग्णालयात दाखल करण्यात आले. पीडित सुखपालच्या तक्रारीवरून नानाखेडा पोलीस ठाण्यात आशुतोष आणि मदन यांच्याविरुद्ध मारहाणीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सध्या पोलीस या प्रकरणाचा तपास करत आहेत.

## मुंगूस पाळणाऱ्यावर वनविभागाकडून कारवाई

साप्ता. अधिकारनामा



**डोंबिवली :** मुगुंस दिसल्यास दिवस शुभ जातो. धनप्राप्ती होते अशी अंधश्रध्दा आहे. याच अंधश्रद्धेतून डोंबिवलीकराने चक्क घरात पिंजरा ठेऊन त्यात चार मुंगूस पाळल्याची घटना उघडकीस आली आहे. या संदर्भात वन खात्याला माहिती मिळताच वनविभगाच्या पथकाने तत्काळ घटनास्थळी जाऊन पिंज्यातून चार मुंगुसांची सुटका करत मुंगूस पाळणा्या विठ्ठल जोशी यांच्या विरोधात कारवाई केली. आजपर्यंत कासव शुभ असल्याचा समज असल्याने अनेकांनी घरात कासव पाळल्याचे अनेकदा ऐकले असेल. स्टार प्रजातीचे कासव पाळणे गुन्हा असून अनेकदा यावर कारवाई देखील करण्यात आली आहे. मुंगूस हा शुभ प्राणी मानला जातो. त्यामुळे काही अंधश्रद्धाळू नियम व कायदा धाब्यावर बसवून मुंगूस पाळून आपल्या इच्छा आकांक्षा पूर्ण करण्याचा प्रयत्न करतात.

पश्चिम डोंबिवलीतल्या शास्त्रीनगर अर्थात जुनी डोंबिवली परिसरात गणेश स्मृती इमारतीमध्ये विठ्ठल जोशी हे आपल्या कुटुंबासह राहतात. मुंगूसचा चेहरा रोज सकाळी पाहिल्यावर दिवस चांगला जातो. तसेच धनप्राप्ती देखिल होते असा विठ्ठल जोशी यांचा समज होता. या भोळ्या समजूतीतून विठ्ठल यांनी चक्क मुंगूस पाळण्याचा निणऱ्य घेतला. एका जंगलातून चार मुंगूस पकडून आणून त्यांनी आपल्या घरात ठेवले. हे चारही मुंगूस पिंज-यात ठेवण्यात आले होते. याची खबर कल्याण वनविभागाच्या पथकाला माहिती मिळाली. वन्यजीव संरक्षण अधिनियम १९७२ कायद्यांतर्गत मुंगूस पाळणे हा गुन्हा आहे. वनविभागाच्या पथकाने तत्काळ विठ्ठल जोशी यांच्या घरी छापा टाकून पिंज्यात बंदिस्त असलेले हे चार मुंगूस ताब्यात घेतले. या प्रकरणी वन विभागाने विठ्ठल जोशी यांच्या विरोधात कारवाई केली आहे. कायद्याने बंदी असलेले वन्यजीवांपैकी पशू-पक्षी पाळू नये असे आवाहन वन अधिकारी एम. डी. जाधव यांनी केले आहे.

## राहुल गांधी यांची ईडीकडून कसून चौकशी

साप्ता. अधिकारनामा



**नवी दिल्ली :** नॅशनल हेरॉल्ड खरेदी व्यवहारातील मनी लॉड्रिंग प्रकरणी काँग्रेस खासदार राहुल गांधी यांची सोमवारी अंमलबजावणी संचालनालयाने (ईडी) कसून चौकशी केली. राहुल यांची ३ तास चौकशी केल्यानंतर दुपारी अडच वाजता त्यांना सोडण्यात आले. त्यानंतर दुसऱ्या टप्प्यात त्यांची पुन्हा चौकशी करण्यात आली. राहुल गांधी आर्थिक गैरव्यवहार प्रकरणाच्या चौकशीसाठी सोमवारी ईडीच्या कार्यालयात हजर झाले होते. यावेळी तब्बल ३ तास त्यांची कसून चौकशी करण्यात आली. त्यानंतर दुपारी राहुल गांधी ईडी कार्यालयातून बाहेर आले. यावेळी त्यांनी रुग्णालयात जाऊन सोनियां गांधींची भेट घेतली. त्यानंतर काही वेळाने ते दुसऱ्या फेरीच्या चौकशीसाठी पुन्हा ईडी कार्यालयात दाखल झाले. दरम्यान सकाळी राहुल गांधी ईडी कार्यालयात पोहोचण्यापूर्वी काँग्रेस कार्यकर्त्यांनी राहुल यांच्या समर्थनात घोषणाबाजी केली. यानंतर पोलिसांनी आंदोलन करणाऱ्यांना घेतले. राहुल यांच्या चौकशीच्या विरोधात सोमवारी देशभरात ठिकठिकाणी काँग्रेस कार्यकर्त्यांकडून आंदोलन करण्यात आले. दिल्लीमध्ये प्रियंका गांधी यांनी पोलिसांनी ताब्यात घेतलेल्या नेत्यांची भेटही घेतली. राहुल गांधी ईडी कार्यालयात पोहोचले तेव्हा पक्षाच्या सरचिटणीस प्रियंका गांधी सोबत होत्या. कार्यकर्त्यांच्या घोषणाबाजीतच राहुल गांधी ईडी कार्यालयात पोहोचले होते. ईडी कार्यालयाबाहेर पोलिसांचा मोठा फौजफाटा तैनात करण्यात आला होता. पोलिसांनी काँग्रेस नेत्यांना आणि कार्यकर्त्यांना तिसऱ्या बॅरिकेडजवळ रोखलं. यानंतर राहुल आणि प्रियंका गांधी पुढे गेले असता नेते तिथेच बसून राहिले. काही वेळाने पोलिसांनी काँग्रेस नेते, कार्यकर्त्यांना ताब्यात घेतलं आणि बसमधून पोलीस ठाण्यात नेण्यात आलं. प्रियंका गांधी या नेत्यांची भेट घेण्यासाठी तुघलक रोड पोलीस ठाण्यात पोहोचल्या होत्या.

स्वातंत्र्यपूर्व काळात जवाहरलाल नेहरू, सरदार पटेल आणि काँग्रेसच्या इतर नेत्यांनी असोसिएट जर्नल्स नावाची कंपनीची स्थापना करून हिंदी, उर्दू आणि इंग्रजी भाषेत तीन वर्तमानपत्रे सुरू केली होती. त्यापैकी नॅशनल हेरॉल्ड हे इंग्रजी दैनिक होते. स्वातंत्र्योत्तर काळात हे वृत्तपत्र बंद पडले. त्यानंतर २०१२ मध्ये सोनिया आणि राहुल गांधींच्या 'यंग इंडिया' या कंपनीने या वर्तमानपत्राचे हक्क पुन्हा विकत घेतले.